**वर्षे अव्याहत प्रकाशित होणारे श्री साईलीला हे मराठीतील एकमेव नियतकालिक आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती नसून वस्तुस्थिती आहे हे सांगण्यास मला अभिमान वाटतो.**

श्री साईबाबांचे चमत्कार खरे असतात का हो? असे मला अनेकजण विचारतात. त्यांनी मराठी नियतकालिकांचा एकूण इतिहास पहावा म्हणजे **'श्री साईलीला'** प्रकाशन हा सुद्धा एका अर्थी बाबांचा चमत्कार ठरतो. नियतकालिकांच्या सृष्टीत मोठमोठ्या श्रीमंतांचा सढळ आश्रय लाभलेली नियतकालिके निघाली होती, तशीच बड्या बड्या दिग्गज लेखक - संपादकांचीही काही नियतकालिके होती, पण ना श्रीमंतीचा आधार टीकला, ना दिग्गज संपादकांना उत्तम वारसदार लाभला आणि अखेर ती नियतकालिके बंद पडली. थोडक्यात केवळ पैशावर (भांडवलावर) नियतकालिके चालली नाहीत तसेच केवळ विद्वता व लेखन संपादन कौशल्यावर चालली नाहीत हे पाहता, **'श्री साईलीला'** तब्बल ७४ वर्षे चालू आहे. ही साईबाबांच्या कृपेचीच किमया नव्हे काय?



**'श्री साईलीला'**चा प्रथम अंक शके १८४५ चैत्र शुद्ध प्रतिपदा, गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर मुंबई येथून (इ.स. १९२३ एप्रिल) प्रकाशित झाला. श्री. ल. ग. तथा **काका महाजनी** व **श्री रामचंद्र तथा बाबासाहेब तर्खड** हे दोघे त्या अंकाचे संपादक होते. पुढे १९२३ ते ३७ श्री. रा. रा. सामंत, १९३८ ते ४१ श्री. रा. वा. धैसास आणि १९४१ ते ४३ श्री. श्री. ना. खारकर यांनी श्री साईलीलाच्या संपादकत्वाची धूरा संभाळली. त्यानंतर डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर, श्री. नागेश सावंत यांच्यासारखे विद्वान, **श्री साईलीलास** संपादक म्हणून लाभले. १९६० साली संस्थानचा ताबा कोर्ट रिसिव्हरकडे देण्यात आला. त्यानंतर संपादक म्हणून कोर्टरिसिव्हरचे नाव टाकण्यात येऊ लागले व प्रत्यक्ष कार्य **'कार्यकारी संपादक'** पाहू लागले. हरि भक्त परायण द. दि. परचुरे, डॉ. श्री. दि. परचुरे, श्री. सदानंद चेंदवणकर, डॉ. व्ही. व्ही. सातपुरकर आणि श्री. अरुण ताम्हणकर या मान्यवरांनी **कार्यकारी संपादक** म्हणून **'श्री साईलीला'** नियतकालिक नावारूपास आणले. तसेच श्री. चकोर आजगावकर यांचीही हंगामी कार्यकारी संपादक म्हणून नियतकालिकास सेवा लाभली.

कार्यकारी संपादकत्वाची ही भक्तीवीणा आता गेली दोन वर्षे आमच्या गळ्यात असून साईसेवेचे हे भाग्य आमच्या पूर्वजन्मीच्या पुण्याईचेच फळ आहे असे मी समजतो. **'श्री साईलीला'**चे **कार्यकारी संपादक पद** ही साईसेवेची - साईसंदेश प्रचाराची एक सुवर्णसंधी आहे अशी माझी मनोमन धारणा आहे. आपणा सर्वांच्या सदिच्छा व श्री समर्थ साईनाथांचे कृपाशीर्वाद यांनी ही सेवा अधिकाधिक समर्थपणे व्हावी एवढीच प्रार्थना. श्री साईलीला यथामती यथाशक्ती मी अधिकाधिक देखणा, वाचनीय, संग्रहणीय करण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक वाचकांचे मान्यवर विद्वान लेखकांचे त्याबद्दलचे उत्तम अभिप्राय हा त्याचा पुरावा आहे. यापुढेही हा प्रयत्न सफल सुफल होवो व श्री साई संदेशाने अवघे विश्व भरून जावो.

**'श्री साईलीला'**च्या **अमृतमहोत्सवी** वर्षात आपण काही नवे नवे उपक्रम करणार आहोत. अमृतमहोत्सवी वाटचालीतील **'अमृतक्षण'** हा त्यापैकीच एक उपक्रम या अंकापासून सुरू केलेला आहे. आपण वाचकांनी या अमृतमहोत्सवी वर्षाचे निमित्त साधून श्री साईलीलाचा जोरदार प्रचार व प्रसार करावा. वर्गणीदारांच्या संस्थेत प्रचंड वाढ करावी आणि 'श्री साईलीला'स मराठीतील एक सर्वाधिक खपाचे धार्मिक, अध्यात्मिक नियतकालिक म्हणून मानाचे स्थान मिळवून द्यावे ही नम्र विनंती.

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
श्री साईलीला

# साई पोवाडा

अवतारी पुरुष हा आला नी शिरडीत चमत्कार झाला.बालक रुप होऊन
प्रगटला लोक म्हणती हो साई त्याला
भक्तीभावाचा उदय हो झाला. शिरडीचा कायापालट हो केला.
दुःख पीडीतांच्या भेटीला गेला नी दुःखाचा नायनाट केला.
आनंदी आनंद हो झाला नी शिरडीत साई अवतरला
जी... जी.. हो... जी... जी...

रामनवमीस भरे सोहळा लाखो भक्त होती हो गोळा
रामनामाचा जयजयकार चालला नी शिरडीत रामजन्माला आला.
अल्ला-मालीक मुखे बोलू लागला. रामनामाचा उद्धार केला
अज्ञानाला ज्ञानी हो केला नी नास्तिकाचा आस्तिक हो झाला
भक्त जाती-भेद विसरूनी गेला नी साईचरणी लीन हो झाला
जी... जी.. हो... जी... जी...

पंढरपूरचा विठोबा झालो नी काका दीक्षीतांच्या भेटीला गेला
काशीरामाचा गर्वहरण केला नी सन्मार्गी लाविले त्याला
बायजाबाईची भाकरी खाऊनी मामीबाइ उच्चारिते तिला
तिने देवाचा देव पाहियला नी देव भक्तीचा भुकेला हो झाला
पाप-पुण्याचा झगडा संपविला नी पुण्यभूमी स्थापन झाली शिरडी
जी... जी.. हो... जी... जी...

**- शरद चिपळूणकर**

## निवेदन

'श्री साईलीला' द्वैमासिक मालकीबद्दल व अन्य तपशील दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाचे निवेदन.

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| २. प्रकाशनाचा कालावधी | - | द्वैमासिक |
| ३. मुद्रकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ४. प्रकाशकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ५. संपादकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| ६. हे पत्र ज्याच्या मालकीचे | - | श्री साईबाबा संस्थान, शिरडी आहे, त्यांचे व १ टक्क्याहून (धार्मिक व चॅरिटेबल संस्था) अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते |

मी, द. म. सुकथनकर यानुसार असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**द. म. सुकथनकर**

(प्रकाशकाची सही)
अध्यक्ष
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## अमृतमहोत्सवी वाटचालीतील

# अमृतकण

## 'श्री साईलीला' बद्दलचे थोडेसे आत्मनिवेदन

**(चैत्र शके १८४७ (अंक १ ला) मार्च १९२५ पान क्रमांक १७६ वरून)**




'श्री साईलीला' जन्मल्याला दोन वर्षे पूर्ण होऊन तिला आता **तिसरे वर्ष** लागले. ''लीला'' हे श्री समर्थ साई महाराजांचेच अपत्य. त्यांच्याच इच्छेने हिचा जन्म झाला. जन्मदात्री या अर्भकाची शक्य ती जोपासना करीत आहे. पित्याचे कृपाछत्र तिच्यावर आहे, पण या बालिकेने जर श्री साईनाथ महाराज विद्यमान असताना जन्म घेतला असता तर तिचे संगोपन यथासांग झाले असते व तिच्या संबंधाने आपले कर्तव्य काय आहे याची जाणीव महाराजांच्या भक्तांना करून देण्याची आम्हाला जरूर पडली नसती. परंतु महाराजांची इच्छा म्हणा किंवा योगायोग म्हणा. तिचा जन्म महाराज समाधिस्थ झाल्यानंतर झाल्यामुळे तिच्या संगोपनाचा भार महाराजांच्या भक्तमंडळावर येऊन पडला. कदाचित महाराजांचीच इच्छा अशी असू शकेल की, आपण देहधारी असताना जे हजारो मुमुक्षुजन आपल्याकडे येऊन काहीतरी सेवा आपल्या हातून घडावी व महाराजांच्या बोधवचनाचा व कृपामृताचा प्रसाद आपणास मिळावा म्हणून सरसावत असत. त्यापैकी किती मंडळी आपण हा स्थूल देह सोडल्यावर आपली आठवण ठेवतात, हे मुकाटयाने पाहावयाचे. निदान आमची तरी अशी (ठाम) समजूत आहे. या दृष्टीने महाराजांचे भक्तांनी जर विचार केला, तर त्यांनाही आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येणार नाही असे नाही.''

वास्तविक पाहता महाराजांकडे येणाऱ्या मुमुक्षुजनांची संख्या अगणित होती, असे आम्ही म्हटले तर त्यात मुळीच अतिशयोक्ति होणार नाही. सरसकट रोज २०/२५ मंडळी नवी येत असत. हा क्रम कित्येक वर्षे चालला होता. दर्शनास येणारी बहुतेक मंडळी काही ना काही हेतूने येत असत व या सर्वांची मनीषा महाराज पूर्ण करीत असत. सर्वांना निरनिराळ्या प्रकारचे अनुभव येत असत. याशिवाय कित्येक मंडळी आपले तन-मन-धन सर्वस्वी महाराजांचे चरणी अर्पण करून महाराजांचे सन्निध स्थायिक होऊन राहिली होती ती निराळीच. या मंडळींना तर महाराजांची लीला पदोपदी पाहण्यास व अनुभवण्यास सापडत असे. या दोन्ही प्रकारच्या मंडळींनी जर आपल्याजवळील महाराजांच्या अनुभवाचा साठा खुला केला तर महाराजांची केवढी मोठी सेवा केल्याचे श्रेय त्यांना मिळेल. आपले अगदी अंतस्थ अनुभव असतील ते वगळून प्रसिद्ध करण्यासारखा पुष्कळ मजकूर असणे शक्य आहे. परंतु ही भक्तमंडळी हे अनुभव आमच्याकडे लिहून पाठविण्याचे मनावर घेतील तेव्हा आम्हाला त्याचा उपयोग होणार. महाराजांनी वेळेवेळी जे अनुभव दिले ते गुलदस्त्यांत ठेवण्याकरिता खास नव्हते. महाराजांचा अवतार ''पुनरपि सुवाटेंप्रती लावण्याजोगा'' या उदात्त तत्त्वावर झालेला होता. ते देहधारी असताना त्यांनी मंगलकार्य करावयाचे ते केले. पुढील कार्यभाग त्यांनी आपल्या भक्तमंडळावर सोपविला, ही पूर्वपरंपरा आहे.


श्री विठोबाराय पुंडलिकांचे निमित्य करून चंद्रभागातटनिवासी होऊन राहिले खरे, परंतु पुढील कामगिरी श्री तुकाराम महाराज, नामदेव महाराज वगैरे संतांनी केली. त्यांनी आपले अनुभव प्रगट करून आज लाखो मुमुक्षुजनांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखवून दिला आहे. तसेच श्री समर्थ रामदास स्वामींचे उदाहरण घ्या. समर्थांनी मोठा शिष्यवर्ग निर्माण करून देह ठेविला. त्यांच्या शिष्यवृंदांनी आपल्या स्वामींची महति सर्व महाराष्ट्रभर गाऊन मुमुक्षुजनांत आपल्या गुरुविषयी भक्ति व प्रेम उत्पन्न केले व त्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखवून दिला. देव व संत आणि गुरू व शिष्य यांची परंपरा अशी आहे.

श्री साई भक्तीची परंपरा अशीच चालविली जावी म्हणून श्री साईलीलेने जन्म घेतला आहे.

卐卐卐

# संत एकनाथांचे 'भावार्थ रामायण'

– प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे



**संत एकनाथ महाराजांनी 'भावार्थ रामायण' लिहून परतंत्र - पराधिन जनतेच्या मनात स्वाभिमानाची, स्वराज्याची ज्योत प्रज्वलित केली व त्यानंतर महाराष्ट्रात संत तुकाराम - समर्थ रामदास यांच्या कार्याने शिवछत्रपतींच्या पराक्रमाने शिवशाहीचा स्वराज्याचा उदय झाला. नाथांच्या भावार्थ रामायणाचे वैशिष्ट्ये सांगताहेत थोर लेखक प्राध्यापक नरेंद्र कुंटे.**

चैत्रशुद्ध प्रतिपदा ते चैत्रशुद्ध नवमीपर्यंत सर्वत्र श्रीरामजन्मोत्सव साजरा होतो. आदर्श म्हणून रामरायाचा आपण सर्वत्र उल्लेख करतो. यथा राजा, तथा प्रजा... असे तेव्हापासून म्हटले जात आहे. आता मात्र यथाप्रजा, तथा राजा... असे म्हणण्याची वेळ आली आहे. आदर्शमूल्यांची पाठराखण करून राज्यावर लोकसत्तेचा अंकुश ठेवणारी प्रजा निर्माण झाली तर पुन्हा 'रामराज्य' येईलही. दाशरथी रामाची सुरसकथा म्हणजे **रामायण !**

त्यातले राम-रावण युद्ध म्हणजे न भूतो, भविष्यती असे. 'रामकथा' ही सूर्यचंद्र असेतोवर या भूमंडळी कथिली जात राहाणारच आहे. रामकथेइतकेच चिरंतन मूल्य 'आत्माराम' कथेलाही आहे. संतांनी आत्मारामाची काळजी केली. विशेषत: श्री एकथान महाराज यांनी 'भावार्थरामायण' लिहिले. कथा दाशरथी रामाचीच होती. परंतु त्या कथेवर रूपक केले. देह आणि इंद्रिये यांच्या राज्यात आत्मा हा राजा. नरजन्मास येऊन म्हणजे त्याच्याच राज्यात येऊन राजाला ओळखू नये ? इंद्रिये हे प्रजानन. त्यांनी राजाची/आत्म्याची चाकरी करायची. सेवा करायची. म्हणून श्री एकनाथ महाराज यांनी लिहिलेले **'भावार्थ रामायण'** हे एकापरीने **'अध्यात्म रामायण'** ठरले. जीवाची जन्मयात्रा सुरू आहे. या जन्मयात्रेतच 'रामकथा' ऐकली पाहिजे, लिहिली पाहिजे, वाचली पाहिजे.

### आत्मोद्धारासाठी 'रामकथा'

श्री एकनाथ महाराजांनी भावार्थ रामायण लिहिले, ते म्हणजे नुसत्या वाल्मिकी रामायणाचा 'अनुवाद' म्हणून मुळीच नाही. रामकथेवर त्यांनी एक विस्तृत असे आध्यात्मिक रूपक रचिले. आध्यात्मिकता ही नेहमी समाजसन्मुखतेनेच अस्तित्वात असते. त्यामुळे अध्यात्मरामायणाला पारमार्थिक आणि सामाजिक असे दोन्ही संदर्भ आहेत. थोर संत आणि तत्त्वज्ञ **डॉ. रा. द. तथा श्रीगुरूदेव रानडे** यांनी **'एकनाथ वचनामृत'** या ग्रंथात श्रीनाथरचित भावार्थ रामायणातले 'निवडक उतारे' वेचून ओवीबंधाच्या स्वरूपात ते पारमार्थिक सामाजिक संदर्भाने मांडून पाहिले आहेत. अर्थात त्यात प्राधान्याने भक्ती विचारच त्यांनी प्रकट केला असून अनुषंगाने काही सामाजिक संदर्भ नोंदविला आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे की, **'एकनाथांच्या या ग्रंथास अध्यात्म रामायण हे नाव अधिक शोभून दिसेल'** या रामायणाची रचना चालू असताना त्यांच्यासमोर (श्री एकनाथांच्यासमोर) सर्व बाजूंनी अध:पतित झालेला तत्कालीन समाजही असावा. कारण त्यास अनुलक्षून त्यांनी कित्येक प्रसंगांची योजना केली असावी. श्रीगुरुदेव रानडे प्रस्तावनेत पुढे म्हणतात, **'रामराज्याची गुढी उभारावी, स्वधर्माला आलेली ग्लानी दूर करावी. दुष्टांचे निर्दालन करावे...' देवद्रोही, देशद्रोही, विश्वद्रोही आणि ब्रह्मद्रोही अशा रावणात निपटून रामराज्य स्थापावे**, अशा अर्थाचे विचार भावार्थ रामायणात एकनाथांनी ठिकठिकाणी व्यक्त केले आहेत. सारांश, त्यांनी लावलेला रामकथेचा अर्थ जसा आध्यात्मिक, तसाच सामाजिकही आहे.' श्रीनाथांच्या भावार्थ रामायणाला श्रीगुरुदेव रानडे यांनी **'महाराष्ट्राचा पारमार्थिक उष:काल'** असे म्हटले आहे. या भावार्थ रामायणात प्रकटलेले परमार्थविषयक विचार मोठे महत्त्वपूर्ण आहेत. आत्मोद्धारासाठी 'रामकथा' असली तरी व्यक्तिगत उन्नती आणि सामाजिक हितकल्याण हीच तिची 'परिणामकता' असायला हवी.

श्रीरामाने स्वप्नदृष्टांत देऊन 'रामकथा' लिहिण्याची आज्ञा आणि प्रेरणा दिल्याने आपण 'भावार्थ रामायण' लिहिले असे श्री एकनाथांनी आरंभीच नमूद केले आहे. मूर्खपणा हीच आपली मिराशी आहे, अशी नम्रता ते बोलून दाखवितात.

ग्रंथकर्ता रामच असल्याने या ग्रंथाचे भूषण व दूषण आपल्या अंगी लागत नाही. ग्रंथाची निंदा अथवा स्तुती करणारे दोघेही आपणास ब्रह्ममूर्तीच होत, असे त्यांनी म्हटले आहे. संताच्या वाङ्मयाचे कर्तृत्व बहुधा गुरूपरंपरेकडेच जाते. तर काही संत आपल्या वाङ्मयाची रचना केली गेल्याचे श्रेय थेट देवाला देतात. प्रतिभा ही साहित्यनिर्मितीचे कारण असते. पण संतवाङ्मयनिर्मितीचे कारण प्रतिभास्वरूप ईश्वर हेच आहे. अर्थात त्यामुळेच त्यांची वाणी आणि वचने ही 'संत्संग' मानली गेली आहेत. भावार्थरामायणातला रामकथेचा सत्संग तुम्हा आम्हास याच श्रद्धेय भूमिकेतून करून घ्यावयाचा आहे. आत्मोद्धार आणि सामाजिक हितकल्याण हीच रामकथेच्या चिंतनाची प्रेरणाही आहे. तसेच ते कथाश्रवणाचे, निरुपणाचे, वाचनाचे पर्यवसानही आहे.

## सप्तद्वारे ओलांडूनच श्रीरामदर्शन

आत्मोद्धार आणि सामाजिक हितकल्याण हीच संतांच्या वाङ्मयीन कार्याची उद्दिष्टे असल्याने श्री एकनाथ महाराजांनी तत्कालीन धार्मिक - सामाजिक स्थितीगतीचेही वर्णन भावार्थ रामायणात केले आहे. मुद्रामंत्राची व्यर्थदीक्षा घेणारे कर्मठ ब्राह्मण, स्वत:च्या मोठेपणाचा गर्व वाहून पोटात मरणभय बाळगणारे क्षत्रिय, द्रव्यलोलुप असणारे वैश्य, अठरापगड जातींनी विस्कळीत झालेले शूद्र यांचे उल्लेख येतात.. सोनार, सावकार, तेली, साळी, शिंपी, रंगारी, वेदपाठक, विद्वान, ज्योतिषी इत्यादी निरनिराळ्या व्यावसायिकांचा उल्लेख करून हे सर्व सत्कर्मविन्मुख कसे झाले होते, हेही ते सांगतात. त्याहीपेक्षा कर्मठपणाचा अतिरेक करणारे आणि सोवळ्याओवळ्याच्या कर्मकांडात आखंड बुडालेले ब्राह्मण भक्तीसही कसे विन्मुख झाले होते, हेही एका प्रसंगातून श्रीनाथांनी सांगितले आहे. प्रसंग आहे सीतास्वयंवराचा. स्वयंवर आटोपून श्रीरामचंद्र आयोध्येस परत आले तेव्हा सर्वजण दर्शनार्थ धावले. परंतु कर्मठ ब्राह्मण मात्र त्यात नव्हते. रामदर्शनाच्या दोषाचे भय त्यांना वाटत होते. उलट एक वेश्या मात्र श्रीरामाचे मुख पाहून तहानभूक विसरली होती. सोवळओवळे या मनाच्या कल्पना आहेत. पण त्याच खऱ्या मानून कर्मठ माणसे प्रत्यक्ष देवदर्शनालाही मुकले. श्रीनाथांनी कर्मठपणाचा उपहास केला आहे. स्त्री-रती, मद्यप्राशन, धनलोभ यामुळे माणूस अंध:पतित होतो. त्याहीकाळी या व्यसनांचा अतिरेक होत होता. आत्महिताला हे 'आंधळे' मुकतात, म्हणून श्रीनाथांना त्यांची 'कणव' आली आणि त्यांनी परोपकार बुद्धीने 'भक्तीमार्ग' दाखविला.

## करूं करूं म्हणतचि मेले...

भक्तीमार्गी नसलेले ते अंधजन, ज्ञानविन्मुख. त्यांची कणव संतांना येते आणि ते तळमळीने उपदेश करू लागतात. श्रीनाथ म्हणाले, नरदेहाची प्राप्ती झाल्यावर त्याचे भगवत्‌भक्ती करून सार्थक करायचे ही गोष्ट उमगली नाही तर तोंडात माती पडल्यासारखीच गत होईल. नरदेह लटका असे म्हणून कुणी उपेक्षा केली. काहींना गर्व होता. काही लोक (जन्मभर) साधन काणते करू ? या भ्रममोहातच अडकले. 'एक करूं करूं म्हणता गेले, कारणे राहिले तैसेचि' अशी स्थिती झाली. अभिमानाने तर सर्वच जण नागविले गेले. म्हणून श्रीनाथ पुढे सांगतात, 'झालिया नरदेप्राप्ती परमार्थ साधावा हातोहाती, जेवि कृषिवलाची स्थिती, मढे झाकिती पेरणीसी' योगायोग म्हणा किंवा संतवाक्यातील एकवाक्यता म्हणा, असाच उपदेश श्री तुकाराम महाराजांनीही केला आहे. मढे झाकून पेरणीची तांतडी करा, असे ते सांगतात. कारण असा हंगाम (नरदेह) पुन्हा येणार नाही. लाभणार नाही. आज परमार्थ करू, असे म्हणणाऱ्यांचाही परमार्थ तसाच राहून जातो. म्हणून 'आत्ता करूं' ही तांतडी हवी, असे श्रीनाथांचे सांगणे आहे. क्षणाक्षणाला काळ आयुष्य खाऊन टाकत आहे. म्हणूनच नरदेह लाभला आहे. तोवरच 'आत्मास्वरूप' रामराजाला पहा. ओळखा. भेटा. प्राप्त करून घ्या.

## राजभवनाची 'सप्तद्वारे...'

श्रीनाथांनी रामदर्शन घेण्यासाठी माणसास राजभवनाची - सप्तद्वारे विशद करून सांगितली आहेत. श्रीरामाचे मंदिर पाहून सुमंताला परमहर्ष झाला. देवदर्शनामुळे तो दु:ख विसरला. रथ सोडून तो आत गेला. दुसऱ्या द्वारी त्याने छत्रचामरे सोडली. पादत्राणे काढून ठेवली. मी-तू पणाची अवघी भेददृष्टी/ भेदबुद्धी त्यजून तो पुढे गेला. तिथे त्याला श्री रामाची भेट झाली. देह हेही राजभवनच. मन हाच या देहाचा सारथी. सुमंतासारखा. राजभवनात आत्मारूपी राम. तिथपर्यंत जायचे कसे ? नाथांनी रूपक केले. त्यांनी राजभवनाची सप्तद्वारे सांगितली ती अशी : 'भावार्थ ते राजभवन, प्रथम दारवंटा श्रवण, दुसरे द्वारी ते साधन, नित्यानित्यज्ञान ते तिजे, चौथा दारवंटा ते मनन, पाचवा तो निदिध्यासन, सहावा तो वैराग्यपूर्ण, सातवा तो जाण साक्षात्कार श्रवण ते साक्षात्कार. हा भक्तीपंथच श्रीनाथांनी इथे विवरून सांगितला आहे. श्रवण म्हणजे सद्‌गुरुंकडून मिळालेला कानमंत्र (नाम) होय. नाम घेताघेताच परमार्थात पाऊलही पडते आणि प्रगतीही घडून येते. परमार्थ करता करताच प्रपंचातही आणि समाजातही चांगले काय ? वाईट काय ? याचा सतत निवाडा करणारी 'विवेकशक्ती' म्हणजे बुद्धी जागी/जागृत हवी. वैराग्य म्हणजे विषयासक्तीपासून दूर. भक्तीप्रेमात वाढ होणे हा वैराग्यप्राप्त झाल्याचा अपरिहार्य, आवश्यक आणि अनुकूल असा परिणाम होय. परमार्थ म्हणजे वृत्तिपरिवर्तन होय. ते याच अर्थाने. परमार्थास सद्‌गुरूभेट, नाममंत्रकृपा, नामस्मरण या तीन मुख्य गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. श्रीनाथांनी सप्तद्वारातून

म्हणजेच साधनमार्गाद्वारे होणाऱ्या वाटचालीतून हा 'भक्तीपंथ' प्रतिपादिला आहे. देह-इंद्रिये या प्रजाजनांना प्रथम श्रीरामराजाच्या दर्शन सुखाची ओढ तरी लागायला हवी. पायरीलाच कुणी आला नाहीतर तो मंदिराच्या भवनात येईलच कसा? भवनात नाही तर गाभाऱ्यात कुठचा येणार? गाभाऱ्यापर्यंत आला नाही तर राजाच्या सुखानंदीमुद्रेचे 'आपादमस्तक' दर्शन तरी तो कसा घेणार? म्हणून नाथ सांगत, परमार्थाची तांतडी करा. सप्तद्वारे ओलांडा. प्रयत्न तरी करा.

### परमार्थी दृढ राखावे मन...

श्रवण ते आत्मक्षात्कार ही सप्तद्वारे ओलांडून श्रीरामदर्शन घेणे इतके सोपे आहे काय? नाहीच नाही. श्रवण घडते. तरी मनरूपी सुमंताला लगेच पुढच्या द्वारापर्यंत चटकन जाता आलेले नाही. क्षणार्धात ही सप्तद्वारे ओलांडता येत नाहीत. म्हणून श्रीनाथांनी लगेचच राजभवनातील सप्तद्वारांच्या प्रवासातील विघ्ने/अडचणी याही गोष्टी सांगितल्या आहेत.

'जितुकी विषयांची आसक्ती, तितुकी विघ्ने श्रीरामप्राप्ती' असे सांगून श्रीनाथ म्हणतात, विषापेक्षाही विषयासक्ती वाईट. कारण विषाने माणूस एकदाच मरतो. पण विषयासक्तीने तो जन्म-मरण यांची पंक्तीच लावून घेतो. जीवनात सुख, ऐश्वर्य, भोग मनसोक्त भोगावेच अशी एक चार्वाक - प्रणाली आहे. विषयासक्त माणसे तिचा आधार घेऊन भोगवादी जीवनाचे समर्थनही करतात. भोग उपभोगण्याला कुणाचा आधार असण्याचे कारण नाही. पण मर्यादित विषय भोगाने अधिककाळापर्यंत देहभोगादी सोहळे / उत्सव पार पाडता येतात. पण विषयासक्तीने 'तरूणपणीच वृद्धत्व' आल्याची अनुभूती येते. तेव्हा माणूस प्रपंचातही सुखाने जगू शकत नाही. परमार्थाची गोष्ट फार दूर राहिली. संतांनीही संसार केला. श्री एकनाथमहाराज हे स्वतःच या सांसारिक जीवनाचे 'आदर्श' होते. प्रपंच आणि परमार्थ यांचा उत्तम समन्वय त्यांनी साधला होता. परमार्थात अधिक 'सुसुख' अनुभवणाऱ्या सतांना प्रपंचाची असणारी ओढ हळूहळू कमी वाटू लागली. तर त्यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीही नाही. विषय तोच. फक्त अनुसंधान बदलले. प्रेम, मोह, माया, लोभ, अहंकार हेच विषय. परंतु ते प्रपंचाऐवजी परमार्थपथावरील सुखाशी तद्रूप जाहले. देवप्रेम वाढले तर देहावरचे प्रेम मुद्दाम कमी करावे लागत नाही. हळूहळू आणि आपोआपच देहासक्ती ऐवजी देवासक्ती वाढू लागते. विषयासक्ती जर कायमच राहिली आणि ती वाढतच राहिली तर मात्र 'राम अंतरला हातोहाती' असे होऊन जाईल. 'जेथवरी विषयप्रीती, त्या रामप्राप्ती कदा न घडे' असा सिद्धांतच श्रीनाथांनी प्रतिपादिला आहे. नरदेह हा गोमटा / सुंदर आहे खरा. पण तो भोगूही नये आणि त्यागूही नये, असे श्रीनाथ सांगतात. भोग आणि त्याग यांचा अतिरेक नसावा. त्यांचा समन्वय करावा... आणि विवेकानेच भोग, त्याग या दोन्ही विषयी दक्ष असावे.

### परमार्थात पुरुषार्थ कोणता ?

परमार्थात 'अशुभ वासना' म्हणजे भक्तिविरहित इच्छा-आकांक्षा, कर्मकांडे, गंडेदोरे-तंत्र-आडाखे इत्यादी गोष्टींच्या मागे न लागता त्यांचा त्याग करावा, असे नाथमहाराज सांगतात... आणि 'परमार्थी दृढ राखावे मन, हे मुख्य लक्षण परमार्थाचे' असे प्रतिपादितात. परमार्थातला पुरुषार्थ तो हाच. मन चंचल, ते स्थिर राहात नाही. सन्मार्गाऐवजी उन्मार्गी होणे हा मनाचा स्वभावधर्मच आहे. म्हणून मनाने ईश्वराचे अनुसंधान राखायला हवे. श्रीरामाचा ध्यास हा प्रथम आणि शेवटीही म्हणजे सतत - सतत मनालाच लागून राहायला हवा. मनोजय केल्यासच राजभवनाचे द्वारातून पुढे चालण्याचे/सरकण्याचे बळ पाप्त होते. अन्यथा नुसते शरीर हे श्रीराम मंदिरात जाऊन काय उपयोग? मन-बुद्धी या सहित हे शरीर श्रीरामद्वारी / श्रीराममंदिरी यायला हवे. 'मनाने मनाला सावध करून, मनाने मनाचे अनुसंधान राखणे.. हे एकनाथांच्या मते परमार्थ मार्गाचे मुख्य सूत्र आहे,' असे भाष्य श्रीगुरुदेव रानडे यांनी या ओवीबंधावर केले आहे. नामस्मरण तर करायला हवेच. त्याशिवाय मन सतत परमार्थ विचारात कसे गढून राहील? यास्तव चिंतन-मनन-लेखन हेही करावे. जपमाळांच्या संख्येत अडकू नये. एक मणी जरी ओढला तरी तो अंतःकरणपूर्वक आणि विशुद्ध भावाने ओढावा. 'मने मना सावधान, मने मना निर्दाळण, मने मना अनुसंधान, या नाव पूर्ण पुरुषार्थ' असे श्रीनाथांनी म्हटले आहे. युद्धकांडातली ही ओवी 'मनोभूमिवरचा - पुरुषार्थ' सांगणारी अशी आहे.

### भजनधर्माने रामभक्ती...

साधकाचे मनाने 'रघुनाथभजन' करावे. सर्व कामे करताना 'रामनाम' घेऊनच ती करावीत. म्हणजेच भक्तियुक्त काम हे निष्काम होते. भजनात तल्लीनता असते. रामनामाची गर्जना ही मनाला जागे करीत असते. मन बसल्या जागीच सैरावैरा धावते. त्याला सतत ताळ्यावर आणावे लागते. भजनात... मुखाने रामगर्जना, हाताने रामटाळी आणि पायाने आत्मारामाच्या वाटेवर चालत राहणे... हीच भक्ती. देह - इंद्रिये यांचे अनुसंधान हेच रामभवनातून श्रीरामापर्यंत येत राहण्याचे 'आत्मबळ' होय.

### श्रीरामदर्शनासाठी नामभक्ती, साधुसंगती...

राजभवनाची सप्तद्वारे ओलांडून श्रीरामापर्यंत जायचे तर देह - इंद्रिये यांचे अनुसंधान हवे. तेच आत्मबळ आहे. असे श्री एकनाथ महाराजांनी सांगितले. तरीही सामान्यजनांना, साधकांना प्रश्न पडला की, श्रीरामदर्शन केव्हा होईल?

परमार्थात प्रत्यक्ष काही भक्ती, उपासना करू लागल्यानंतरच ईश्वराच्या भेटीविषयीची ओढ/तळमळ मनास अधिक लागून राहते. जिज्ञासुवृत्तीने मग मनात प्रश्न उभे राहू लागतात. देवदर्शन केव्हा होईल ? हा प्रश्न कुठल्याही संप्रदायातल्या कुणाही साधकास पडतोच. श्रीनाथांनी ही जिज्ञासा जाणूनच या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. ते म्हणता, नुसत्या गुणगायकीतून देव कसा भेटेल ? गुणगायन करणाराच्या मनात प्रेम हवे, जिव्हाळा हवा, आत्मीयता हवी. सर्वसद्‌गुण जिंकावेत. अन्न शिजल्यावर जशी वाफ जिरावी लागते. मुरवावी लागते. मगच तेअन्न गोड/रुचकर लागते. लगेचच अन्न वाढून घेतले तर ते अपक्व राहते. म्हणून श्रीरामविषयीचे गुणगायन करून प्रेम अंत:करणात रूजवावे, असे श्रीनाथ सांगतात.

श्रीरामाची कृपा होण्यास रामभक्तीही चालेल वा दृढवैरही चालेल असा मजेशीर दाखला नाथांनी दिला आहे. कारण उपकार करणाऱ्याला (अनन्य भक्ती करणाऱ्याला) आणि अपकार करणाऱ्याला (दृढवैर करणाऱ्याला) अशा दोघांनाही श्रीराम भेटतो. प्रेम आणि वैर या दोन्हीमुळे श्रीरामाचे 'स्मरण' केले जाते. अशा स्मरणभक्तीमुळे तो दोघांनाही भेटतो. बिभीषण, हनुमंत अशासह सर्व भक्तांना अनन्य भक्तीमुळे श्रीरामदर्शन झाले... आणि रावणास त्याने केलेल्या वैरभक्तीमुळे श्रीरामाची भेट झाली. अर्थात रावणभक्तीने फक्त श्रीरामाची भेट झाली. भक्तांना मात्र श्रीरामचे दर्शनही घडले आणि श्रीरामाची प्राप्तीही झाली. युद्धकांडात श्रीनाथांनी या प्रेम आणि वैर भक्तीचा सविस्तरपणे विचार मांडला आहे. देह-इंद्रियाचेही तसेच आहे. प्रेमाने इंद्रियांना सुख मिळते. वैराने फक्त भेटी पुरतेच क्षणिक सुख मिळते. ते टिकून राहात नाही. संपून जाते. प्रेमसुख मात्र जन्मोजन्मी अखंड राहते. कितीही जन्म मिळोत, भक्तीसेवासुखासाठी संत आणि भाविक आतुर झालेले असतात. अर्थात ज्यांना अखंड सुख हवे आहे, ते प्रेमभक्तीने ईश्वराशी जुळून राहतात. वैरभावनेने देवाची भेट घेणाऱ्यांची ख्याती 'राक्षस' म्हणून उरते. आपण देवकुळीचे की राक्षसकुळीचे ? हे ज्याने त्याने ठरवावे. वैरभावनेने अपकार करणाऱ्यालाही भेदभाव न करता, भेट देतो ही रामाची थोरवी होय.

### साधूंची संगती महत्त्वाची....

श्रीरामदर्शन व्हावयाचे यासाठी 'नामभक्ती' ही तर अहर्निशी केली पाहिजेच. परंतु त्याचबरोबरच अनुसंधान टिकून राहण्यासाठी साधूंची संगतीही धरली पाहिजे. सुंदरकांडात श्री एकनाथ महाराज सांगतात की, हरिगुण कीर्तन-गायन करणाऱ्या हरिदासांची वारंवार भेट घ्यावी. भेटीत भक्तीचे 'स्मरण' घडते. दोषांचा विसर पडतो. साधुंचे संभाषण म्हणजेही एक 'अधिष्ठान' मानावे. कारण देव स्वमुखाने बोलत नाही. साधुमुखाने तो आपली थोरवी प्रकट करीत असतो. दोन भक्त, दोन साधू किंवा साधू आणि भक्त हे 'एकत्र' जमले की, देवाचाच महिमा, देवाचेच उपकार, देवाचीच कृपा याविषयी बोलतात. त्यामुळे हे बोलणे/संवाद म्हणजेही एक प्रकारे तपश्चर्याच केल्यासारखे आहे. साधूंच्या चरणस्पर्शाने महादोष जातात. याचा अर्थ असा की, साधूच्या आचरणाप्रमाणे वागल्यास (सदाचरण) साधकातील अवगुण (दोष) नष्ट होतात. 'साधुसज्जन संगती, सभाग्य भाग्याते पावती, सत्संगे भवनिर्मुक्ती, वेदशास्त्राशी संमत' असा हा विशेष विचार होय. साधूंच्या सहवासातील सर्व कर्मेही सत्कर्मेच होय... मग तिथे कर्म अकर्माची चर्चा थांबते. कारण साधुबुद्धी ही सद्‌बुद्धीनेच वावरत असते. श्री एकथान महाराजांनी साधू हा शब्द संत-सत्पुरुष यांना अनुलक्षून वापरला आहे.

साधू-संगतीमुळे 'जन्म-मरण सकळही नासे' असे श्री एकनाथ महाराज सांगतात. जन्म-मरण टळते का ? नाही. तर पुन्हा जन्म मिळाला तरी तो देवकुळात, साधू कुळात, संतकुळात, साधक कुळात मिळतो आणि 'भक्तिसेवा' होत राहते. असे यातील वर्म होय. संत-साधू हे आपल्या उपदेशाने एकूण समाजातली भक्तिमार्गी भाविकांचा एक समूह/मेळावा जन्मयात्रेत आणि जीवनयात्रेत उन्नत - अवस्थेकडे नेतात. हे संतांचे कार्य चालूच असते. हे ईश्वराचेच एक 'लीला-चक्र' होय. 'जन्म-मरण सकळही नासे' हा संदर्भ वरील तत्त्वाशी जोडून घेतला पाहिजे.

### गुरुवाक्याशिवाय परमार्थ कैसा ?

नामभक्ति आणि साधुसंगती ही परमार्थप्राप्तीची साधने असली तरी ही साधने गुरुवाक्याने बांधली गेलेली असतात. 'गुरुवाक्य' म्हणजे सद्‌गुरुंनी दिलेला मंत्र. मंत्रातली अक्षरे. अक्षररुपाने दिलेले देवाचे स्वरूप.

गुरुमंत्र न घेता, नामोच्चार न करता, साधुसंगती न धरता नुसती देह यात्रा करून 'धावपळ' करण्यात काय अर्थ ? अशा धावपळीने कुठे देव मिळतो काय ? धावपळीने फक्त देह शिणतो. यात्रा करूनही मन उदास होते. पुढच्या यात्रांसाठी बुद्धीचे विकल्प सुरू होतात. श्री एकनाथ महाराजांनी युद्धकांडात अशा धावपळीपेक्षा 'गुरुवाक्य' हा परमार्थाचा मुख्य 'आधार' सर्वप्रथम शोधावा, असे म्हटले आहे. तसेच धूर कोंडून घेणे, पर्वतावरून उडी टाकणे, जीभ कापून घेणे या अघोरी गोष्टी त्याज्य आहेत. त्यात परमार्थ/भक्ती मुळीच नाही, असे सांगतात. दर्शनासी धांडोळू नये, तीर्थोतीर्थी भ्रमू नये. उलट श्रवण-कीर्तन या सत्संगासह महावाक्य गुरुवाक्य म्हणजे 'मंत्राक्षरे' यांचा प्रथम स्वीकार करावा. मंत्राक्षरे जपावीत. गुरुवाक्यकृपा झाली तरच रघुनाथ भेटेल. बालकांडात तर श्री एकनाथांनी एक गंमतशीर दाखला दिला आहे. ते म्हणतात, 'स्वयंबुद्धीने विवेकज्ञान, विकल्पे मात्र होये क्षीण, गुरुवाक्ये अतिनिपुण, ते ज्ञान पूर्ण निश्चये. हे ज्ञान

सद्‌गुरुपाशीच असते. गुरुज्ञानाने (सद्‌गुरुंनी दिलेल्या ईश्वरप्राप्तीच्या साधनेसाठीच्या मंत्राक्षराने) विकल्प येत नाहीत. 'गुरुवाक्येवीण जे ज्ञान, ते क्षयरोगी जन्मले जाण, विकल्पमात्रे सांडी प्राण, अति क्षीण अपायी' गुरुवाक्य न घेतलेले, तरीही स्वत:ला भक्तिमान समजणारे असे लोक, हे विकल्प, भ्रम, भेद, संशय यामुळे नुसत्याच काथ्याकुटात मन-बुद्धीने संपून जातात. शरीर तर दिवसेंदिवस वृद्ध होतच असते. एके दिवशी तेही विकलांग होते. जीवात्मा निघून जातो. संशयी-विकल्पी असा हा क्षयरोगी मरून जातो. पण गुरुवाक्य/गुरुमंत्र/मंत्राक्षरे ही 'अक्षय' असल्याने त्यांचा 'स्वीकार' केलेला साधक असा 'मरून' जात नाही. तो पुन्हा भक्तिसेवेसाठीच जन्माला येतो. श्रीनाथांनी वाङ्मयदृष्ट्या 'क्षय-अक्षय' या शब्दावर केलेली ही कोटी मोठी महत्त्वपूर्ण अशी आहे.

## सद्‌गुरु कोणास म्हणावे ?

परमार्थात गुरुवाक्याचे एवढे महत्त्व आहे, तर 'गुरुवाक्यबोध' देणारे सद्‌गुरू कोण? कुणास सद्‌गुरु म्हणावे ? याचीही चर्चा श्री एकनाथ महाराज यांनी युद्धकांडात केली आहे. श्रीनाथांच्या ओवीबंधावर भाष्य करताना श्री गुरुदेव रानडे यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे की, 'स्वरूपी अवधान ठेवणे हे सत्पुरुषाचे मुख्य लक्षण असून अशा सद्‌गुरुचे सेवन करणे यापरते परमार्थाचे दुसरे साधन नसल्यामुळे ज्याला हे संसारधरणे उठावे असे वाटत असेल त्याने मुखी गुरुनाम-स्मरण, मनी गुरुमूर्तीचे-ध्यान, श्रवणी गुरुचरित्र-श्रवण याप्रमाणे दृढ गुरुदास करावे.' श्रीरामची भेट घालू देणाऱ्या कुणाला मी संत, साधु, सत्पुरुष म्हणू ? हा प्रश्न साधकाच्या मनात उपस्थित झाला होता. म्हणून श्री एकनाथ महाराज म्हणाले, 'ऐक त्या चिन्हासी, यथामतीसी सांगेन' या संत, साधू, सत्पुरुष याने इतरांना गुरुवाक्य/गुरुमंत्र देण्याआधी स्वत: साधन करून देव पाहिलेला असला पाहिजे. मगच त्याने देव दाखविण्याची कृपाशक्ती (गुरुवाक्य/गुरुमंत्र) इतरांना द्यावी. गुरुसेवा हीच प्रधानभक्ती आहे. मंत्रोच्चारण केल्यानेच गुरुदास्य घडते. 'नाना साधनी बहुत, कदाकाळे नव्हे प्राप्त, तो गुरुदास्यास्तव येथ, होय प्राप्त निजात्मा' नुसत्या प्रदक्षिणा घालून काय उपयोग ? प्रदक्षिणा घालणारी पाऊले पुढे पडत असताना मुखी नाम, अंत:करणी प्रेम असायला हवे. 'मी प्रदक्षिणा घालत आहे. दिसत नाही काय ? वाटेतून दूर व्हा,' असे ओरडून संतापणारा साधक काय कामाचा ? त्याचे लक्ष धड नामाकडे नसते आणि अंत:करणात देवाविषयी प्रेमही नसते. प्रदक्षिणा घालून मी केवढी भक्ती करीत आहे हा देखावा तो करीत असतो. अन्यथा त्याचे लक्ष देवाच्या नामाशिवाय, प्रेमाशिवाय, अन्यत्र गेलेच नसते. त्याहीपेक्षा तो ओरडला - संतापला नसता. त्याने नम्रपणाने, हळुवारपणे आपली पाऊले थांबवून मगच प्रदक्षिणेसाठी वाट शोधून काढली असती. पण असे घडत नाही. म्हणून श्री नाथांनी 'गुरुसेवा-सद्‌गुरुचरणी-गुरुदास्य' हा विचार इथे मांडला आहे. 'पायी नित्य प्रदक्षिणा, अथवा का दर्शनागम, बुद्धीचा निश्चयो पूर्ण, आज्ञा प्रमाण संप्रदाये' असे त्यांचे वचन होय.

## हरिकीर्तनाने श्रोता - वक्ता सुख पावे....

गुरू वाक्यानेच परमार्थ होईल, असे प्रतिपादन केल्यानंतर हरिकीर्तनाचा साधनमार्ग श्री एकनाथ महाराज विशद करून सांगतात. देवकुळात, संतकुळात, जन्माला यावे, म्हणजे भक्तीसेवा जन्मोजन्मी करता येईल असे भक्तांचे देवापायी मागणे आहे. तसेच हरिभक्त जर जन्माला आला तर ते कुळ पवित्र मानले जाते, असेही म्हटले जाते. कुळ विचाराशी श्री एकनाथमहाराज यांनी परंपरेचा विचार निगडीत केला आहे. तो परस्पर पूरकही आहे. कधी कुळामुळे कीर्ती तर कधी भक्तामुळे कुळाची ख्याती. हे भक्त हरिकीर्तन करतात.

हरिकीर्तनी श्रोता आणि वक्ता हे दोघेही सुखी होतात. कारण वक्ता हरिगुणांचे 'गायन' करतो. श्रोता हरिगुणांचे 'श्रवण' करतो. गायन-श्रवण घडत असताना वक्ता आणि श्रोता या दोघांच्याही मनात हरिमूर्ती उभी असते. त्यामुळे कीर्तनात भगवंत उपस्थित असतो, अशी श्रद्धा आहे. श्री एकनाथमहाराजांनी युद्ध कांडात त्या विषयीचा विचार मांडला आहे. देह-इंद्रिये ही आत्म्याच्या राज्यात वावरतात, तेव्हा त्यांनी राजाची/आत्म्याची सेवा करावी, अशी अपेक्षा आहे. इथे हरिगुणांचे गायन वाणी/जिव्हा करते आणि हरिगुणांचे श्रवण कान करतात. जीभ आणि कान दोन्ही मिळून रामराजाचीच भक्ती-कीर्ती रुजवितात आणि तिचा प्रसारही करतात. हे कार्य म्हणजे आत्मारामाची सेवा/चाकरी करण्यासारखेच आहे. श्री एकनाथ महाराज स्वत:ही उत्तम कीर्तन-प्रवचन करीत होते. कीर्तनभक्ती ही ईश्वराची सगुणपूजा वाणीने बांधते आणि श्रोत्यांचे कान हे पूजेचे साक्षीदार असतात. कीर्तनात सतत नामगर्जनाही होत असते. त्यामुळे देवाचे क्षणभर जर विस्मरण घडलेले असेल तर श्रोते क्षणार्धात जागे होतात. सावध होतात. त्यांचे मन-बुद्धी-अंत:करण हे भगवंताविषयी ओढ घेते. कीर्तनभक्तीने स्मरणसातत्य टिकून राहते. श्री नामदेवरायांच्या कीर्तनात पांडुरंग येऊन नाचत असे, असा स्वत: श्री नामदेवरायांनी दाखला दिला आहे. आत्मारामाच्या राज्यात देह-इंद्रिये श्रीरामाची स्तुती गातात, तेव्हाच त्यांना रामभेट होण्याची अनुकूलता अनुभवाला येते आणि ते मनोमन आनंदून जातात.

## सदासर्वकाळ हरिनाम...

कीर्तनभक्तीचा साधनविचार जसा श्री एकनाथांनी स्पष्ट करून सांगितला आहे, तसाच नामभक्तीचाही विचार त्यांनी

सुंदरकांडात विशद केला आहे. ते म्हणतात, 'नामसि नाही स्नानबंधन, नामासि नाही विधिविधान, आसनी भोजनशयनी जाणा, नाम पावन हरीचे.' नामसंकीर्तनात भगवंत आनंदाने नाचतो आणि भक्ताच्या चरणाची धूळ स्वत:च्या मस्तकी लावून घेवून स्वत:ला धन्य म्हणवितो. इथे भगवंत भक्तांसाठी धावून येतो, हा ईश्वरीकृपेचा विचार त्यांनी स्पष्ट केला आहे. भूतलावर कीर्तन सुरू झाले तर मला वैकुंठी करमत नाही, असे भगवंताचे म्हणणे आहे. 'माझिया भक्तांचे आवडी, हरिकिर्तनी घाली उडी, कीर्तनसुखाची मज गोडी, कडोविकडी नाचत' हरिकीर्तन करू लागताच त्या भक्ताच्या विषयी चित्रगुप्ताची नोंदवही स्तब्ध होते. तिची पाने कोरी राहतात. पुण्यच पुण्य गोळा होऊन येते. पापाची नोंद होणारच नाही. 'रामनामाची प्रभा गाढी, वहीची पाने ना खोडी ना मोडी, अवघी वहीच उघडी, केली रोकडी हरिनामे' पुढे श्रीनाथमहाराज म्हणतात, 'ऐसे करिता कीर्तन, श्रोते वक्ते दोघेजण, होती आनंदी निमग्न, आनंदघन श्रीरामनामे' एका अभंगातही श्रीनाथमहाराजांनी सांगितले आहे की, 'जेणे करूनी मूर्ती ठसावी अंतरी श्रीहरीची, ऐसी कीर्तनमर्यादा आहे संतांच्या घरची' अर्थात ही कीर्तन मर्यादाच काय, कीर्तन सामर्थ्याचीही खूणगाठ समजली पाहिजे.

युद्धकांडात नामस्मरणाची महती सांगताना 'भवतारक हे रामनाम' असा सिद्धांत ते प्रतिपादितात. 'राम' हा दोन अक्षरी मंत्र सतत जपल्यास जिव्हा रसमय होते. रामभेटीचे ते प्रवेद्वार होय, असे श्रीतुलसीदासांचे एक पद आहे. श्रीनाथराय म्हणतात, 'वाचे उच्चारितो तुझे नाम, जीवी धरिले असे प्रेम, क्षणे आमुचे करील भस्म, भय दुर्गम नामाचे' एवढे सामर्थ्य रामनामात आहे. हनुमंताने पाषाणावर श्रीराम लिहिले आणि पाषाण तरले, ही कथा सर्वश्रुत,आहेच. देह-इंद्रियांचे राज्य विकारबळे पाषाणवत् आहे. गुणांच्यायोगे हरिकीर्तनाने तिथे राममहिमा गायिला गेला तर तो पाषाणही तरेल. विकार संपतील. देह पाषाणावर आत्मारामाचे नाव लिहिले वा गोंदले तर देहासक्ती कमी होऊन देवासक्ती वाढेल. भवसागरातून तरण्यास एवढेच एक साधन आहे. सुंदरकांडात पाषाण तरल्याची कथा येते. 'नित्य करिता श्रीराम स्मरण, कीर्ती कल्याण निजविषयी' अशी साक्ष श्रीनाथांनी दिली आहे.

**श्रीरामनाम हेंच खरे औषध...**

श्रीरामनाम म्हणजे श्रीनाथांच्या शब्दात 'राममुद्रा' होय. नाममुद्रा जशी कपाळी लावतात, तशी राममुद्रा जिभेवर विराजते. जिथे कृष्ण तिथे विजय... तसेच, जिथे राममुद्रा तिथे विजयप्राप्ती. श्रीनाथमहाराज म्हणतात, 'रामनाम निरसी पुण्यपाप' कारण रामनाम जप म्हणजे परमतप होय. त्यायोगे निर्विकल्प समाधी लागते. देवाशी मनाची एकाग्रता निर्माण होते. मग हे नाम घेणे म्हणजे कुठल्याही कर्म-अकर्माच्या बंधनापलिकडचे होय. रामनामाचे चिंतन केल्यास प्रत्यक्ष दुराचारीसुद्धा साधू होऊ शकतो. मात्र अशा दुराचारीला पश्चाताप झाला पाहिजे. पुन्हा आपण दुष्कर्म करणार नाही, असे त्याने ठरविले पाहिजे.

जन्मयात्रेत दु:ख होणे अपरिहार्य आहे. सर्वकाळी आणि सर्वत्र सुख मिळत नाही आणि आनंद टिकून राहात नाही. श्रीनाथांनी ही परिस्थिती जाणूनच युद्धकांडात 'रामनाम हेच खरे औषध होय' असे प्रतिपादले आहे. जन्माला घालणारा तो देव. देव हा सुखस्वरूप. त्याचे विस्मरण जीवाला घडते म्हणून दु:खभोग. मग या दु:खावर उपाय करायला नको काय ? हवा. तोंच उपाय म्हणजे पुन्हा रामनामाच्या (औषध) नित्यसेवनाने (स्मरणात्मक भक्ती योगाने) सुखस्वरूपाशी/देवरूपाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करणे होय. ही एकरूपता जशी, जितकी, जिथे होत राहील, तशी तितकी आणि तिथे सुखवस्था प्राप्त होत राहील. लक्ष्मण बेशुद्ध पडल्याची कथा सर्वज्ञात आहे. मग त्यावरचा उपाय काय? तर रघुरामाचे चरणतीर्थ घ्यावे, असे श्रीनाथ सुचवितात. रामनामरस हेच लक्ष्मणाला शुद्धीवर आणू शकेल आणि त्याचा जीव वाचवू शकेल, 'औषधरसामाजी देख, वेगी घालोनी चरणोदक, रस देता एकाएक, सकळ दु:ख निरसेल' नाम हीच संजीवनी होय. प्रल्हादाला देखील दु:खभोग नशिबी आला होता. परंतु त्यानेही रामनाम हेच औषध घेतले व तो दु:खमुक्त झाला. देह-इंद्रिये यांच्या राज्यात अभिमानाने, अहंकारानेच दु:ख येते. माणूस मुर्च्छित होतो. त्याला शुद्धीवर आणायचे असेल तर सतत 'नामचिंतन' हीच एक औषधीमुळी होय. स्त्रिया जशा गळ्यात माळ (मंगळसूत्र/कृष्णमणी) घालतात, तसे पुरुषांनी गळामाळ म्हणजे नामस्मरणी घालावी, असे श्रीनाथ सांगतात. मंगळसूत्र हे स्त्रियांचे सौभाग्यचिन्ह आहे. तसे परमार्थ करणाऱ्या पुरुषाचे भूषण म्हणजे गळ्यातील तुळशीमाळ (नामस्मरणी) होय. ती तुटली (नामस्मरणात खंड पडला) तर वैधव्य (दु:ख) आले समजावे, अशी सुस्पष्टता श्रीनाथरायांनी नोंदविली आहे. लंकेत सीता होती, तर रामनामाच्या स्मरणामुळे ती रामाजवळच होती. रामावेगळी ती नव्हतीच. म्हणून लंकेतही क्रूर राक्षसिणींच्या गराड्यात राहूनही सीता निर्भय होती. असा उल्लेख सुंदरकांडात श्री एकनाथ महाराजांनी केला आहे.

**जानकी : रामसेवकात आचार्य**

जानकी हे सीतेचेच नाव होते. सर्व रामसेवकात जानकी/सीता हीच 'आचार्य' होती. कारण श्रीरामाची प्राप्ती परक्यांच्या पायानी होणारी नसून त्यासाठी स्वत: साधक होऊन शिणले पाहिजे याची स्पष्ट जाणीव तिच्याठिकाणी होती, असे श्रीनाथांनी सुंदरकांडात सांगितले आहे. 'श्रीराममहिमा अगाध, तैसीच जानकी अबोधबोध, निष्ठा अति विशुद्ध, सामर्थ्य शुद्ध जानकीचे' असे सांगून श्रीनाथांनी सीतेचा भजनधर्म म्हणजे

रामनामासी जुळून राहणे, हा होता... रामनामाचे स्मरण हेच तिचे 'नित्य व्रत' होते.... अशी पुस्ती जोडली आहे. 'परपायी रघुनाथ, न भेटे निश्चिती कोणासी' हे जानकीचे वचन ते अधृत करतात. श्री एकनाथ महाराजांनी देह-इंद्रियांचे राज्य आणि आत्माराम हाच इथला राजा होय, असे रामकथेचे रूपक केले आहे. त्याचा विचार करता जानकी म्हणजे काया होय. काया म्हणजे शरीर होय. ते रामाशी एकनिष्ठ राहिले पाहिजे. तसे राहणे हा पतिव्रतेचा धर्म होय. शरीराने आत्मारामाची सेवा करायची तर ती मन-बुद्धिसहित केली पाहिजे. कारण मन-बुद्धीच्या शक्तीनेच शरीर धर्म कार्यरत होत असतात. शरीरावर खरी सजा मन-बुद्धीचीच असते. म्हणून मन-बुद्धीसहित काया ही श्रीरामभजनी लागावी, अशी मुख्य भूमिका इथे श्रीनाथांनी विशद केली आहे. आत्मा हा कायाधरून राहिला आहे. मग काया म्हणजे जानकी हीच सर्व इंद्रियांची 'आचार्य' नव्हे काय? होय. तीच सर्व सेवकांची आचार्य/मुख्य होय. शरीर आहे, तोवरच आत्मारामाची सेवा श्रीरामनामाचे स्मरण करून रूजू करता येईल. काया जाईल तर सगळे जीवनच आटोपले. म्हणून जानकी-आत्माराम म्हणजेच इंद्रिय आणि आत्मा यांचा इतका जिव्हाळ्याचा संबंध आहे, हे श्रीनाथांनी सांगितले आहे.

### हनुमंताऐसी दृढ रामभक्ती...

श्रीरामाचा नि:सीमभक्त म्हणजे हनुमंत होय. त्याने श्रीरामाची खूप सेवा केली. बुद्धिमतांमध्ये हनुमंत हा श्रेष्ठ म्हणविला गेला आहे. तो दास म्हणवून घेताना दक्ष असतो आणि सदैव श्रीरामाचाच पक्ष (बाजू) घेतो. स्वत:च्या कार्यात तो सदैव निमग्न असतो. त्याने आपली पांचही ज्ञानेंद्रिये आणि पांचही कर्मेंद्रिये श्रीरामभजनी लावून घेतली आहेत. श्रीरामाचा दास, तो हनुमंत असा आहे. त्याच्या अहर्निश रामनामजपाचे स्वरूप कसे आहे ? तर श्री एकनाथ महाराज यांनीच ते पुढे सांगितल्याप्रमाणे आहे. 'न म्हणे वेळ अवेळ, दिवसरात्र अक्षर पळ, घटिका मुहूर्त काळवेळ, अचळ रामभजनी.'

### बुद्धिचा निश्चय हवा...

हनुमंत म्हणजे बुद्धिवान-उपासक. देह-इंद्रिये यांच्या राज्यात आत्मारामाची सेवा बुद्धीचा निश्चय करून रूजू केली पाहिजे. सारथी सुमंत हा मन म्हणून योजिला आहे. तर हनुमंत हा बुद्धिनिश्चय म्हणून योजिला आहे. मन-बुद्धि या दोहोंनी श्रीरामाची सेवा करावयाची असल्याने मनाची एकाग्रता आणि बुद्धिचा निश्चय व्हायलाच हवा. श्री नाथमहाराज म्हणतात, 'बुद्धिनिश्चये जाणा, सावधान रघुनंदन, राखिते झाले अनुदिन, क्षणेक्षण न विसंबे' दृष्टीने हनुमंत श्रीरामाला पाहतो, श्रवणी रामगुण ऐकतो, रामकथेचा सुगंध नाकाने घेतो, जिभेवर रामरसाचेच पक्वान्न चाखतो, रामालाच तो अलिंगन देतो, वाचेने रामशब्दाचाच उच्चार करतो. त्याचे हात रामकार्यातच



रत झाले आहेत, रघुनंदनाच्या दर्शनमिषानेच त्याची पाऊले श्रीरामाच्या दिशेने पडत आहेत. सर्वभावे सर्वकार्ये करताना श्रीरामाचीचा 'आठवण' हनुमंताला होत राहते. बुद्धीने विस्मरणाची डुलकी घेता कामा नये. बुद्धी पांगळी झाली की, परमार्थ आटोपलाच. प्रपंचाची तर त्रेधा-तिरपीटच होते. 'बुद्धिने सर्वही होते, बुद्धिदाता नारायणु' असे समर्थ रामदास स्वामींनीही म्हटले आहे. प्रपंची-परमार्थी दोन्हीकडे बुद्धी शाबूत पाहिजे. विवेक तिलाच सुचतो. निर्णयही तीच घेते. म्हणून हनुमंत जशी श्रीरामाची अहर्निशी सेवा करतो. तसे देह-इंद्रियांच्या राज्यात मनाइतके बुद्धिचेही काम असून बुद्धीने 'निश्चयी' असणे सर्वाधिक अगत्याचे आहे.

### देव-भक्ताचे ऐक्य...

देह-इंद्रिये आणि आत्माराम यांचे सख्य इतके असले पाहिजे की, त्यात वाढ होऊन त्यांचे 'ऐक्य' झाले पाहिजे. या देव-भक्तांचे ऐक्य, वर्णन करताना श्री एकनाथ महाराज म्हणतात की, रघुनाथास आपल्या स्वामीचा आणि हनुमंतास आपल्या दास्यत्वाचा विसर पडून, भक्ताने देव आणि नामाने देवभक्त गिळून टाकले. ही अवस्था प्राप्त होणे, हाच मुख्य-परमार्थ होय. मी देह, तू देव... म्हणूनच मी-तू पणाचा भेद विसरला गेला पाहिजे... हा भेद राम-हनुमंत यांच्यात संपला होता... म्हणूनच ते दोघेही स्वानंदी बुडून गेले. त्यांचे भेदपण उरलेच नाही. सतत रामभजनाने हनुमंताने श्रीरामास गिळून टाकले आणि श्रीराम इतुका जवळ आला की, हनुमंताचे भक्तपण त्याने गिळून टाकले. हरिभजनानेच देव-भक्त ऐक्य

होते. 'हनुमान आणि रघुनंदन, अनन्य भावे पडले अलिंगन, पूर्ण पावोनि समाधान, जाले अभिन्न देवभक्त' असे वर्णन श्री एकनाथ महाराज यांनी सुंदरकांडात केले आहे.

## खरे पूजन कोणते ?

श्रीरामाची खरी पूजा कोणती ? आत्मारामाची खरी सेवा कोणती ? या प्रश्नांची उत्तरे श्री एकनाथ महाराजांनी युद्धकांडात दिली आहेत. 'जेवढी देवाची व्याप्ती तेवढी व्यापक आपली चित्तवृत्ती करून कायावाचामने, पण अभेदभावाने, देवास भजणे (स्मरण करणे) हेच खरे पूजन असून असे देव-भक्त हे सबाह्य अभ्यंतरी 'एकरूप' झालेले असतात' असे भाष्य श्री गुरुदेव रानडे यांनी श्रीनाथांच्या या ओवीबंधावर केले आहे. (प्रस्तावना) देह-इंद्रिये यांच्या राज्यात आत्मारामाचे पूजन हे मन-बुद्धीने केले पाहिजे. देवाला पाहणे, जाणणे आणि प्राप्त करून घेणे या परमार्थातील विकासपर किंवा प्रगतीपर 'अवस्था' होत. नामस्मरणाने जसे-जसे देवाविषयीचे प्रेम वाढत जाईल, तसतशी ही पूजा घडत राहते, सख्यत्त्व महत्त्वाचे. नवविधाभक्तीत श्रीरामाशी सख्य करावे, ही भक्तीच श्रीसमर्थ रामदासांनी सांगितली आहे. सख्य आणि प्रेम या परस्परपूरक गोष्टी आहेत. नित्य नव्या उत्साहाने हे प्रेम वाढत राहते, असे श्री एकनाथांनी म्हटले आहे. मी देवाचा आश्रय, देव माझा आश्रय, अशी स्थिती होते. 'तो आमुचे देवतार्चन, आम्ही त्याचे करू पूजन, तो आमुचे ध्येय पूर्ण, करू ध्यान आम्ही त्याचे.'

## सर्वांभूती भगवंत हाच परमार्थ...

खरा भक्त कोण ? खरी समाधी कोणती ? मुख्य परमार्थ कोणता ? या तीन महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे श्री एकनाथ महाराजांनी युद्धकांड, बालकांड आणि अरण्यकांड यात दिली आहेत. या तीन प्रश्नांविषयी पुष्कळ मतांचा गलबला आहे. योग्य उत्तर, तात्काळ मिळाले तर वाटचालीची गती तीव्र होते, स्पष्ट होते. 'हृदयी ध्यान आणि मुखी नाम धरून जो निष्कर्माचे मुकुटभूषण घालतो तो खरा भक्त होय' असे श्रीनाथांना वाटते.

भक्त हे रामाचे दास होते, ही गोष्ट खरी असली तरी 'भजन' करण्यातच ते रमले आहेत. पण 'ध्यान'देखील तितकेच महत्त्वाचे आहे. जे निश्चयीभक्त ध्यानच्युत होत नाहीत, तेच माझे खरे भक्त होत. तो देवाचे इतके ध्यान करतो की, क्षणभरदेखील देवाला त्याचेपासून दूर जाता येत नाही. 'हृदयी ध्यान चरणांचे, मुखी नाम श्रीरामाचे, मुकुटीभूषण निष्कर्माचे, तीर्थ रामाचे परिकर' ध्यानात निमग्न असलेला हा रामभक्त स्वत:स दास, किंकर, चाकर समजतो. भक्तीने इतकी विनम्रता यायलाच हवी. देवापेक्षा मी मोठा आणि देवाच्या जयजयकारापेक्षा माझा जयजयकार करा, असे सांगणारे ते रामभक्त कसले ? ते भोंदुभक्त होत. श्रीरामाचे चरणी लीन व्हावे, हीच रामभक्ताची इच्छा-आकांक्षा असते. 'श्रीराम सांडोनि आन, जो जो का वांछी धनमान, त्यासी श्रीरामाचे ज्ञान, सर्वथा जाण दुर्लभ' असा स्पष्ट इशाराही श्रीनाथांनी दिला आहे. दुसरा महत्त्वाचा प्रश्न होता की, 'खरी समाधी कोणती ?....' त्यालाही श्रीनाथांनी उत्तर दिले आहे. ते म्हणतात, ईश्वराविषयीचा भक्तिभाव न सोडणे आणि स्वत:तील दुर्गुणांचा त्याग करणे, ही खरी समाधी-अवस्था होय. नाहीतरी बकध्यान ही समाधी नव्हेच नव्हे. श्रीनाथांनी 'शुद्ध-समाधान' ही समाधी होय, असे म्हटले आहे. देवाशी जेवढे आपण एकरूप होऊ तेवढा क्षण मनाला-बुद्धीला - शरीराला शुद्ध-समाधानासारखाच असतो. नुसती मूग गिळून बसणे वा तटस्थ राहणे म्हणजे समाधी-अवस्था नव्हे. निर्मळ आणि स्वच्छदृष्टीने (स्पष्ट आणि हितावह विचाराने) वागणे-वावरणे म्हणजे समाधानी अवस्था होय. प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीकडे सावधान/दक्ष राहून त्या दोन्हीत काहीही न्यून न ठेवणे ही खरी भक्ती होय. विवेकदृष्टीने वागतो, तो खरा भक्त, असेच श्री एकनाथ महाराजांचे सांगणे आहे.

## सर्वांभूती भगवंत पहावा...

मुख्य परमार्थ कोणता ? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करून श्री एकनाथ महाराजांनी या प्रश्नाचे समर्पक उत्तरही दिले आहे. ते म्हणतात, 'सर्वांभूती भगवंत, हाचि मुख्यत्त्वे परमार्थ ! अशा परमार्थास जुळून राहिलेल्या भक्ताला 'मी भक्त' असा अभिमान नसतो. भक्तभावार्थी मी, असे तो स्वत:स उल्लेखितो. प्रेमामुळे तो रघुनंदनाकडे धावतो. अशा वाटचालीस रडणे, पडणे, अडखळणे हेही घडून येते. पण भक्तिमार्गाची कांस न सोडता श्रीरामाच्या प्रेमाने (बळ) तो भक्त पुन्हा पुढे पाऊल घालण्यास... चालण्यास मोठ्या उत्साहाने उद्युक्त होतो. मन-बुद्धीने त्याने ही तयारी करून ठेवलेली आहे. सर्वांभूती भगवंत पाहण्याची विशाल आणि व्यापक वृत्ती-भावना निर्माण होते. ही तशी सहजासहजी घडून येणारी गोष्ट नव्हे. अगदी प्रपंचातही आपण नित्यव्यवहारात ऐकतो-बोलतो-सांगतो की, चांगल्या गोष्टी पहायला नि त्यांचे कौतुक करायला 'चांगली दृष्टि' लागते. एरव्ही प्रापंचिक वैभवाला 'दृष्ट' लावणारी रोगट, स्वार्थी, मत्सरी, कपटी, हीन अशीच दृष्टी पहावयास मिळते. भावदृष्टी आणि विचारदृष्टी ही दोन्ही स्वच्छ आणि स्पष्ट असणे फार फार आवश्यक असते. काहीच्या नजरा वाईट असतात हे पाहताक्षणी कळून येते. अशी नजर आपण टाळतो. परमार्थातही स्वार्थी, कपटी, मत्सरी, रोगट, हीन नजरा नसतातच असे नाही. त्याही असतातच... म्हणूनच परनिंदा तिथेही मनाच्या फांदीवर बसून मुखावटे केली जाते. कानांनी ती ऐकायला मिळते. कधीकधी भाविकजन परस्परांतून दुरावतातही. प्रपंची-परमार्थी सर्वत्र हा धोका असतोच. प्रपंचात

उल्लेखाने शब्दाशब्दी होतो आणि संघर्ष उद्‌भवतो. परमार्थात अगदी शब्दाशब्दी झाली नाही तरी 'अनुल्लेखाने मारण्याची एक रीत' पहावयास मिळते. वगळून पुढे चालणे तिथे सोयीचे असते. म्हणून प्रथम दृष्टी स्वच्छ आणि स्पष्ट हवी. अशी दृष्टी लाभली म्हणजेच सर्व जीवमात्र हे भगवंताचे पडते. मग त्यांच्याशी चांगले वागण्याचा जीवनधर्म ठरतो. परस्परांशी 'मैत्रभाव' त्यातूनच जडतो. श्री एकनाथ महाराजांनी हा सर्व विचार लक्षात घेऊनच 'सर्वांभूती भगवंत पहावा' असे उपदेशिले आहे. जो स्वत:ला परमार्थी म्हणवितो, त्याच्या अंगी ही दृष्टी यायला हवी. परमार्थ रूजल्याचे ते मापकयंत्रच समजाले पाहिजे.

### हनुमंतास श्रीरामाचे वरदान...

रामकथा जिथवर चालेल, तिथवर हनुमंताची दास्यभक्ती ही देखील पृथ्वीतलावर नांदेल, इतके राम-हनुमंत यांचे अतूट नाते आहे. युद्ध कांडात श्री एकनाथांनी 'मारूतीचे श्रीरामाजवळ मागणे' आणि श्रीरामाने त्यास दिलेले वरदार' या विषयी चर्चा केली आहे. देवाचा अनुभव घ्यावा आणि प्रपंचात परमार्थ पहावा हे त्यांचे मुख्य सांगणे आहेच. भावार्थ-रामायणाचा विभाग संपविताना श्रीनाथांनी, मारूतीने श्रीरामाजवळ काय मागितले? आणि श्रीरामाने कोणते वरदान दिले ? या संदर्भाच्या चर्चेच्या निमित्ताने प्रत्येक भक्ताने काय मागावे ? आणि देव त्यांना काय देतो ? हा विशेषविचार प्रतिपादिला आहे.

हनुमंताने श्रीरामाजवळ एकच मागणे मागितले. रामकथा जोवर पृथ्वीवर असेल, तोवर माझ्या देहात प्राण असो देत. जिथे रामकथा वाचली जात असेल, तिथे मी विनम्र पणाने उपस्थित असेन. रामकथा, तिथे हनुमंत... देव तिथे भक्त... असेच मागणे मागितलेले आहे. रामकथा सांगावी. रामकथा ऐकावी, जिथे रामनाम, जितथे हनुमंतध्यान असावे. 'तुझ्या निजनामे करून, महापापांचे करोनि कंदन, प्रायश्चित्ता बोळवण, जगउद्धरण श्रीरामे' अशी रामनामाची ख्याती आहे. हनुमंताने असेही म्हटले की, हे रघुनंदन, श्रीरामा माझे मागणे हे केवळ माझ्या पुरते नाही. कुणीही रामभक्त असो, त्यांना रामनामाने मुक्तता द्यावी. 'माझे मागणे हेचि परम, उत्तममध्यमादि अधम, सकळी स्मरावा श्रीराम, मरणजन्म छेदक' कुणाही भक्ताने एकदा जरी श्रीराम म्हटले तरी त्यांचे सर्वोत्तम व्हावे. दुष्टपणाची भाषा करून वैर निर्माण करणाऱ्यांची दुष्प्रवृत्ती, मनातील विकल्प नष्ट होवोत, बुद्धीचा भ्रम नष्ट होवो... 'नामे करावे सुखसंपन्न, हेचि वरदान मज द्यावे' हे मागणे हनुमंताने श्रीरामापाशी मागितले. भवरोगातून रामनामाच्या औषधाने लोकांना वाचवावे, ही संताची तळमळ आहे. हनुमंतासारख्या 'बुद्धिमत्ता वरिष्ठं' अशा भक्तानेही हेच मागणे मागितले. 'विश्व अवघे सुखसंपन्न, सदा असावे स्वानंद मग्न, हेचि द्यावे वरदान, म्हणोनि लोटांगण घातले' श्री एकनाथ महाराजांनी हनुमंतांचे हे मागणे ओवीबद्ध केले असून आत्मोद्धाराबरोबर जगतहित कळण्याची एक विशालदृष्टी इथे प्रकट केली आहे.

### ऐक्यस्थितीचे वरदान...

प्रपंच आणि परमार्थ या दोन्हींत रमलेला विश्वातील भक्त, साधक, माणूस हा सुखी होवो, हेंच हनुमंताने श्रीरामापाशी 'मागणे' सांगितले आणि श्रीरामाने 'तथास्तु' म्हणून हे वरदान दिले. परंतु वरदान देताना श्रीराम म्हणाले की, तुझ्यामुळे रामकथा सनाथ होईल. रामभक्तीमुळे तू चिरंजिवियात सर्वश्रेष्ठ होऊन राहशील. इतकेच नव्हे तर तुझी भक्ती पाहून तुझ्या केवळ नामाने नातिकांचे शून्यवाद आणि कुतर्क्यांचे कुतर्क भस्म होतील' श्रीरामाचे हे उत्तर ऐकून हनुमंत क्षणभर अस्वस्थ झाला. तेव्हा पुन्हा श्रीरामाने सांगितले की, 'स्वरूप एक, नामे भिन्न' अशीच तुझी-माझी स्थिती आहे. भक्तांच्या अधिष्ठानानेच देव संतुष्ट असतो. 'तुझ्यासह माझे स्मरण' ही ऐक्यस्थिती असून तिचेच वरदान मी तुला देत आहे, असे श्रीरामाने सांगितले. हनुमंतासह श्रीरामाचे स्मरण करणारे श्रोता-वक्ता हे दोघेही उद्धरतील. 'श्रीराम आणि हनुमान, स्वरूप एक नामे भिन्न, भेद नाही अणुप्रमाण, ऐक विवंचन सांगने' असे श्री एकनाथांनी म्हटले आहे. 'मजपरीस हनुमंता, सर्वस्वे भजता माझ्याभक्ता, अति आल्हाद मज रघुनाथा, ते सुख सर्वथा न बोलवे' माझ्या भक्तांचे सर्व मनोरथा मी पूर्ण करेन, असे वरदान श्रीरामाने दिले.

### मनबुद्धीसहित 'आत्माराम'

श्री एकनाथांनी भावार्थ रामायणातून 'परमार्थ' सांगितला. देह-इंद्रिये यांच्या राज्यात आत्मारामाची सेवाही मन आणि बुद्धी यासहीत करावी, हा त्यातला मुख्यार्थ होय. मनाची इच्छा आणि बुद्धीचा निश्चय पाहून शरीर त्यामागे येतेच येते. प्रजाजन स्वरूप इंद्रियांनी 'रामनामाचे स्मरण' करीत देहराज्यात राहावे व कधीनाकधी तरी त्यातला 'रामराजा' आत्मसात करावा. त्यासाठी जन्मोजन्मी भक्त म्हणून वावरावे. रामाने आपुला म्हटले की, भक्त 'त्याचा' झाला. ही ऐक्यस्थिती व्हावी. श्री गुरुदेव रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे हे 'अध्यात्म रामायण' असल्याने इथे देव-भक्त यांचीच चर्चा होणार. नरजन्माचे सार्थक करून घेण्यासाठी सद्‌गुरुप्राप्त कृपामंत्र घेऊन त्याचे अहर्निश स्मरण करावे आणि देव पाहावा, जाणावा. देव प्राप्त होणे ही दूरची गोष्ट. पण त्यासाठी देहराज्यातल्या आत्मारामाला ओळखण्याची तळमळ हवी. तातडी हवी. श्री निंबरगी महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'स्वराज्य' संपादन करावे. त्यासाठी 'तूर्त सवड' आहे. इतुकेच. हनुमंत-राम यांनी कृपा करावी. एवढेच मागणे.

卐卐卐

# रामायणातील हनुमान

– गजानन कुलकर्णी

भारतीय संस्कृतीमध्ये धर्मग्रंथ म्हणून ज्या ग्रंथांना मान्यता मिळाली आहे. त्यामध्ये महाभारत आणि रामायण या दोन ग्रंथांना अनन्य साधारण महत्व आहे. त्यांना आग्रणी असे स्थान प्राप्त झालेले आहे. वास्तविक पाहता हे दोन्ही ग्रंथ धर्मतत्वज्ञान विषयक गाढे ग्रंथ नाहीत तर ते आहेत खऱ्या अर्थाने ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ. पूर्वकालीन ऐतिहासिक परंतु समाजोपयोगी अशा प्रमुख घटनांचे सम्यक दर्शन घडविणारे आरसे. या आरशांच्या म्हणजे या ग्रंथाच्या वाचनाने पूर्वकालीन घटनांचे दर्शन आम्हाला घडते. या दोन्ही ग्रंथामध्ये चितारण्यात आलेल्या घटनांमधून काही विशिष्ट व्यक्तीरेखांचे प्रमुख घटनांमधून परिपूर्ण असे दर्शन घडते असे असेल तर मग यांना धर्मग्रंथ म्हणून एवढा मान मिळण्याचे कारण काय असा साहजिकच प्रश्न पडतो. या दृष्टीने विचार करता धर्माची व्याख्या शोधणे क्रमप्राप्त ठरते. धर्म म्हणजे तरी काय ? सामाजिक नीती नियमांची, बंधनांची एक सूत्रबद्ध चौकट म्हणजे धर्म. या चौकटीच्या आतस्थित राहून माणसाने आपले जीवन कशा तऱ्हेने व्यतीत करावे अशी शिकवण देतो तो धर्म. आणि या शिकवणूकीचे स्वरूप विशद करून सांगतात ते धर्मग्रंथ. या दृष्टीने विचार केला तर महाभारत आणि रामायण हे दोन्ही ग्रंथ खरोखरीच महान धर्मग्रंथ ठरतात.

महाभारतामध्ये दूर्योधन, कर्ण, धृतराष्ट्र, शकूनी हया अशा काही व्यक्तीरेखा कौरवाच्या पक्षाकडून समोर येतात. तर सत्यनिष्ठ धर्मराज आणि त्यांचे महाबली असे चार भाऊ भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव व या पाच जणांची धर्मपत्नी द्रौपदी आणि या सर्वांमागे छायेप्रमाणे उभा असलेला भगवान गोपालकृष्ण. या प्रमुख व्यक्तीरेखांचं सुंदर दर्शन घडतं. महाभारत हा सत् आणि असत प्रवृत्तीमधला झगडा आहे. अंती सत्याचा विजय कसा होतो, सत्य हाच खरा धर्म आहे याची शिकवण हा ग्रंथ देतो. महाभारतात वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच आणि त्यांच्या आचारविचारांचं सुंदर दर्शन आपल्याला घडते. आजही या घटना आम्हाला खरोखरीच बोधप्रद ठरणाऱ्या आहेत. प्रतिक रुपाने काही सांगून जाणाऱ्या आहेत. त्या दृष्टीने आम्ही त्याकडे पाहिले पाहिजे.



रामायणाची कथा ही महाभारतापेक्षा थोडी वेगळी आहे. आदर्श अशा पुरुषोत्तम श्री रामचंद्राची ही जीवनगाथा आहे. या ग्रंथाचा नायक स्वत: श्री प्रभू रामचंद्र असून महाविष्णूचा हा सातवा अवतार मानवरुपे भूतली साकार झाल्यावर नीती नियमांचे पालन त्यालाही कसे बंधनकारक ठरले, जीवंन प्रवासात त्याला किती भयानक संकटांना तोंड द्यावे लागले, त्यातून मार्ग काढीत असताना त्यांनी कोणते आदर्श आमच्यासमोर ठेवले हे तपासून पाहण्यासारखे आहे. राम संकटांना कधीच भ्याले नाहीत, तर संकटांवर मात करीत पुढेच जात राहिले. रामायणात ज्या प्रमुख व्यक्ती रामाभोवती वावरताना आपल्यासमोर येतात त्यात नळ, नीळ, जांबुवंत, सुग्रीव आणि त्याचा सचिव हनुमान या राम पक्षाकडील तर रावण, विभीषण, कुंभकर्ण, रावणपुत्र इंद्रजित या विरोधी पक्षाकडील प्रमुख व्यक्ती आहेत. त्यामध्येही हनुमंताचे स्थान अनन्य साधारण आहे. महाबलाढ्य बलभीम मारुती इतकीच मारुतीची खरीतर आम्हाला प्राथमिक ओळख आहे. शक्तीदेवता म्हणून आम्ही त्याची भक्ती करतो आणि त्याच्यासारखी शक्ती मागतो. मारुती हा जसा

शक्तीमान तसाच महान बुद्धीमान म्हणूनही प्रसिद्ध आहे. मात्र त्याची फारशी ओळख आम्हाला नाही म्हणून मारुतीची आम्हाला अपूर्ण ओळख आहे असंच म्हणावसं वाटतं. आज तीच ओळख आपण या लेखात करून घेणार आहोत.

सुमेरू नावाच्या सोनेरी पर्वतावर महाबलाढ्य असा पिंगट, पितवर्ण वानरराज केसरी हा राज्य करून राहत होता. त्याच्या महाराणीचं नाव होतं अंजनी. गौतमाची मुलगी अंजनी ही अतिशय कांतीमान होती. तिला मनासारखा पुत्र हवा होता. म्हणून ती भगवान शंकराची आराधना करीत होती. रात्रंदिनी ती भगवान शंकराकडे एकच मागणं मागतं होती. ''भगवान मला वाऱ्यापेक्षा चपळ, वज्रापेक्षा बळकट, बृहस्पतीसारखा बुद्धीमान आणि तुझ्यासारखा परोपकारी पुत्र दे.''

भगवान शंकरांनी अंजनीवर कृपा केली. केसरी अंजनीला पुत्र झाला. कोणी म्हणतात, चैत्र शुद्ध पौर्णिमेला हनुमंताचा जन्म झाला. तर कोणी म्हणतात, अश्विन वद्य १४ ला हा जन्म झाला. काहींच्या मते कार्तिक शुद्ध पौर्णिमा हीच हनुमंताची जन्मतिथी. कोणाच्या मते तो वार शनिवार होता, तर कोणाच्या मते मंगळवार. गणपतीप्रमाणेच मारुतीच्या जन्मतिथीमध्ये अशी मतभिन्नता दिसून येत असली तरी ती वेळ मात्र सूर्योदयाचीच होती. यात मात्र एकवाक्यता दिसते. आज मात्र चैत्र शुद्ध पौर्णिमा हीच हनुमंताची जन्मतिथी म्हणून प्रचलित आहे. सर्वमान्य झालेली आहे.

हनुमंताच्या जन्माने वानरराज केसरी आणि अंजनी देवीचा आनंद गगनात मावेनासा झाला. दिसा मासानी मारुतीराय तीथं वाढू लागले. कुठेही जाताना अंजनी बाळाला आपल्या पोटाशी बांधून घेऊन जाई, तर कधी पिता आपल्या पाठीवर घेऊन त्याला उड्डाण करायला शिकवी. हनुमंत एक एक विद्येत असा तरबेज होत होता. मोठा होत होता.

एक दिवस वानराज केसरी काही कामासाठी बाहेर गेला होता. त्याच्या पाठोपाठ अंजनी फळे, फुले गोळा करण्यासाठी बाहेर पडली. मारुतीराया एकटाच घरी होता. त्याला अतिशय भूक लागली होती. इतक्यात त्याला आकाशात लालभडक असा सूर्यगोल दिसला. हे लालभडक फळ क्षुधाशमनार्थ योग्य आहे असे मनाशी ठरवून मारुतीरायांनी आकाशात झेप घेतली. जन्मल्यापासूनच मारुतीची चपळाई कमालीची होती. वाऱ्यालाही मागे टाकणारी. म्हणूनच लोकांनी त्याला मारुती असं नाव ठेवलं होतं. मारुतीने सूर्याकडे झेप घेतली त्यावेळी मलय - हिमालय पर्वतावरून शितल वारे वाहत होते, म्हणून सूर्यकिरणांचा दाह त्याला जाणवला नाही. सूर्यालाही मारुतीचे हे साहस पाहून आश्चर्य वाटले. त्याने आपले रुप सौम्य केले. मारुतीला जवळ येऊ दिले. इतक्यात राहूने येऊन सूर्याला गाठले. तोपर्यंत मारुती सूर्याजवळ जाऊन पोहचला होता. त्याने राहूसह सूर्याला मिठी मारली. राहू घाबरला आणि कशीतरी आपली त्या मिठीतून सुटका करून घेऊन तो पळत सुटला. पळत पळत थेट तो इंद्राकडे आला. त्याने इंद्राला सर्व हकीकत सांगितली तसा इंद्र वज्र घेऊन निघाला तो सूर्याजवळ आला आणि त्याने आपल्या हातातले वज्र मारुतीवर फेकले.

त्या वज्र प्रहारामुळे मारुतीची हनुवटी तुटली. तिथे मोठी जखम झाली. तेव्हापासून लोक त्याला हनुमान म्हणून संबोधू लागले. हा सारा प्रकार ब्रह्मदेव दुरून पहात होते. त्यांना मारुती म्हणजे कोण हे माहित होते. त्याची अशी अवस्था होऊन चालणार नाही, अन्यथा भगवान शंकरांचा महाकोप ओढवेल हे ते जाणून होते. ब्रह्मदेव पुढे झाले. त्यांनी हरप्रयत्नाने मारुतीला शुद्धीवर आणले. त्याची खरी ओळख आणि त्याच्या भविष्यातल्या कार्याची जाणीव सर्वांना करून दिली. ते ऐकून इंद्र आणि इतर सर्व देव खजिल झाले. इंद्र पुढे झाला आणि ब्रह्मदेवाची क्षमा मागून म्हणाला, याला माझ्यासारखा तेजस्वी करीन. हा जर माझ्याकडे शिकायला आला तर यांचे अंतःतरण बुद्धी आणि भावना यांना मी असा उजाळा देईन की, अंधार अगर किल्मीष म्हणून कसे राहणारच नाही. त्याची जगात 'वाग्मी' म्हणून किर्तीच किर्ती होईल. सूर्याचे बोलणे संपते न संपते तोच वरूण पुढे झाला आणि म्हणाला, मारुतीला पाण्याचेच काय, पण कसल्याही पाशांचे, बंधनांचे भय राहणार नाही. नंतर कुबेर, विश्वकर्मा, ब्रह्मदेव यांनीही आपल्या शक्तिशस्त्र शहाणपणाचे सहाय्य मारुतीला सदैव राहील असा आशिर्वाद दिला आणि भूलोकी पुन्हा वानरराज केसरीच्या घरी आणून सोडला.

मारुती थोडा मोठा झाला आणि मग वानरराज केसरीने त्याचे मौंजी बंधने केले. मारुती सूर्याच्या शाळेत येऊन दाखल झाला. तिथे त्याने झटपट सर्व वेदवेदांगाचा अभ्यास पूर्ण केला. या व्यतिरिक्त आणखीही अनेक कला सूर्याने त्याला शिकविल्या. ''नहचस्य शास्त्रे सदृशोऽस्तिकश्चित्। वैशारदे छंदगतौतथैव ॥ अशा बिनतोड परिक्षेत तो उतरला. मारुती एवढा विद्वान झाला की पुढे त्याने व्याकरणावर ग्रंथ लिहिला. भारतातील अकरावा व्याकरणकार म्हणून त्याची ख्याती आहे.

शिक्षण पूर्ण झाल्यावर सूर्यदेवाने मारुतीला आपला शिष्य सुग्रीव याच्याकडे पाठविले. तिथे पाठविताना सूर्यदेवाने मारुतीला उपदेश केला. ''हनुमंता आता तुझे इथले शिक्षण पूर्ण झाले आहे म्हणून पुढील देवकार्यासाठी मी तुला माझा शिष्य सुग्रीव याजकडे पाठवित आहे. तुझ्या विद्वतेचे आणि कर्तृत्वाचे तो खरोखरीच चीज करील. ह्या सुग्रीवाचा जेष्ठ बंधू वाली हा लंकेच्या दुष्ट राजाला रावणाला मिळालेला आहे. खर, दुषण, त्रिशिरा, शुर्पणखा अशी मंडळी या रावणाने दंडकारण्यात पेरून ठेवली आहेत. मारीच, सुबाहु आणि

त्राटिका यांचा त्रास आता उत्तर भारताला होऊ लागला आहे. ऋषीमुनींचे यज्ञ तिथे बंद पडत आहेत. सज्जनांना जगणे मुष्कील झाले आहे. यासाठी दंडकारण्याचे आता महाराष्ट्रात रुपांतर केले पाहिजे आणि त्यासाठीच मी तुला तीथे पाठवित आहे.

मारुतीवर अशी मोठी जबाबदारी टाकून सूर्याने मारुतीला सुग्रीवाकडे पाठविले. मारुती सुग्रीवाकडे आला. सुग्रीव त्यावेळी वालीच्या भीतीने ऋष्यमूक पर्वतावर राहात होता. मारुती तिथे गेला. त्याने सुग्रीवाची भेट घेतली. सारी हकीकत त्याला सांगितली आणि थोड्याच अवधीत सुग्रीवाचा अंतरंग सचिव होऊन तो तिथे राहील.

त्याचवेळी हरवलेल्या सीतेचा शोध घेत घेत राम आणि लक्ष्मण पंपासरोवरावर येऊन पोहचले. आपल्या सचिवाबरोबर राजकारणाची चर्चा करीत बसलेल्या सुग्रीवाची नजर त्यांच्यावर पडली आणि हे दोन धनुर्धारी पुरुष कोण याचा शोध घ्यायला सुग्रीवाने मारुतीला आज्ञा केली.

मारुतीने तात्काळ ब्राह्मणवेष धारण केला आणि तो राम लक्ष्मणच्या समीप येऊन उभा राहिला. राम लक्ष्मणाची त्याने विचारपूस केली. त्यांचा येण्याचा हेतू जाणून घेतला आणि रामाबद्दल त्याची खात्री पटताच आपला ब्राह्मण वेष टाकून मारुती मूळ रुपात प्रगट झाला आणि श्रीरामाचे चरणी त्याने लोळण घेतली. श्रीराम आणि हनुमान - मारुती यांची ही पहिलीच भेट. पहिल्याच भेटीत मारुती श्रीरामाचा शिष्य बनला आणि अजरामर झाला.

राम लक्ष्मणाला खांद्यावर बसवून हनुमंताने उड्डाण केले आणि सरळ सुग्रीवासमोर आणून उभे. श्रीराम लक्ष्मण आणि सुग्रीवाची भेट झाली आणि दोघेही अग्नीसाक्षीने जीवाचे जिवलग मित्र बनले. दोघेही समदु:खी होते. सुग्रीवाची पत्नी वालीने हरण करून नेली होती. तर सीतेला रावणाने पळवली होती. वाली आणि रावण दोघे मित्र होते. ह्या वालीचा श्रीरामानी वध केला आणि सुग्रीवाला पुन्हा त्याचे राज्य आणि पत्नी मिळवून दिली.

तापसी वेष धारण केलेले श्रीराम मग त्याच पर्वतावर एका गुहेत वास्तव्य करून राहिले. सुग्रीव राज्य उपभोगात निमग्न झाला. चार महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी तो सीता शोधाबाबत काही बोलेना हे पाहून लक्ष्मण फारच चिडला. तो रागाने लालीलाल झाला आणि सुग्रीवाच्या सभेत येऊन उभा राहीला. त्याने सुग्रीवाला चांगलेच खडसावले. सुग्रीवाला कार्याची जाणीव झाली आणि त्याने आपल्या सर्व सचिवांना तातडीने आमंत्रणे पाठविली.

मध्यंतरीच्या काळत सुग्रीव जरी राज्योपभोगात गढून गेला होता, तरीही मारुती गाफील नव्हता. त्याने महेंद्र, हिमालय, विंध्य, कैलास, मंदराचल या पर्वतराजीमध्ये राहणाऱ्या महापराक्रमी वानरांची आणि अस्वलांची एक जबरदस्त पलटणच मारुतीने तयार केली आणि प्रवर्षण गिरीवर राहणाऱ्या राम लक्ष्मणासमोर आणून उभी केली. सुग्रीवाने सर्वांना कार्याची कल्पना दिली आणि दशदिशांना सारी वानरसेना रवाना केली. त्यानंतर जांबुवंत, हनुमान, अंगद नल इत्यादी आपल्या महाचतुर अशा सचिवांना एकत्र बोलावून कार्याचे गांभीर्य समजावून सांगितले. हनुमंताला समोर बोलावून सुग्रीव म्हणाला, ''हनुमंता, पाण्यात, पृथ्वीवर आणि आकाशात तुला सारखाच प्रवास करता येतो, तुझी गती रोखू शकेल असा जगतात कोणी नाही तेव्हा तुझ्यावर आमचा विशेष भर आणि भरवसा आहे. सुग्रीवाच्या या वक्तव्यानंतर श्रीरामाने मारुतीला जवळ बोलावले आणि प्रभू रामचंद्र म्हणाले, 'हनुमंता सुग्रीवाचे म्हणणे खरे आहे. सीतेचा शोध लावण्यास तूच एक योग्य आहेस. तू माझा माणूस आहेस. माझा दूत आहेस याची सीतेला खात्री पटविण्यासाठी मी तुला ही मुद्रिका देतो ती घे आणि सीतेला दाखव म्हणजे तिची खात्री पटेल. हनुमंताने रामाच्या हातातील मुद्रिका घेतली आणि कामगिरीवर निघाला.

अंगद जांबुवंत आणि हनुमान आपलं सैन्य घेऊन निघाले. ते एका विशाल अशा पर्वतावर येऊन विचार करीत बसले असताना तिथे जटायूचा भाऊ संपाती अचानकपणे येऊन दाखल झाला. त्याने सीता हरणाची सर्व हकीकत सांगून कपटी रावणाने सीतेला कोठे नेऊन ठेवले आहे तो पत्ता सुद्धा सांगितला. मारुतीने भुभुत्कार केला आणि एकदम उड्डाण करून आकाशात झेप घेतली. त्याची पहिलीच उडी मैनाक पर्वतावर पडली.

हा मैनाक पर्वत समुद्रातून मध्येच वर आला होता. मारुतीला वाटले हे मध्येच काहीतरी विघ्न उत्पन्न झालेले दिसते. त्यावर तो मैनाक पर्वत म्हणाला, ''बाळा तू माझ्या मित्राचा मुलगा. इंद्राने पर्वताचे पंख तोडले तेव्हा वायुदेवाची मदत मला झाली आणि मी समुद्रात दडी दिली. वायुदेवाने आपली सारी शक्ती तुला दिली आहे. तू त्यांचा मानसपूत्र आहेस. श्रीराम प्रभूंच्या शुभ कार्याला निघाला आहेस. तेव्हा या कामात तुला होईल ती मदत करावी म्हणून मी वर आलो आहे.

मारुतीने ही हकीकत ऐकताच त्या मैनाक पर्वताला आदरपूर्वक वंदन केले आणि त्याला आपली लाथ लागली म्हणून त्याची क्षमा मागितली आणि तिथून त्याने उडी घेतली ती थेट लंकेच्या सीमेवर उभ्या असलेल्या पहाडावर. तिथून त्याला लंकेचा सारा प्रदेश नीट न्याहाळता येत होता. मारुती आता लंकेकडे जायच्या तयारीत होता. लंकेच्या वेशीवर समुद्रात वास्तव्य करून असलेल्या नागमाता सूरसाने हे

पाटील आणि विचार केला. लंकेतील राक्षसापुढे हा टिकेल काय ? पहावं तरी परीक्षा घेऊन. तिने विशाल राक्षसीचे रुप धारण केले आणि आपला जबडा उघडून ती मारुतीच्या वाटेत येऊन उभी राहिली. मारुती तिच्या जबडयात अलगद उतरला आणि सुक्ष्म रूप धारण करून बाहेर पडला. त्याने आकाशात झेप घेतली तोच दुसरी बया त्याला आडवी आली. ही होती सिंहीका राक्षसीण. आकाशातून उडणाऱ्याची छाया तिच्यावर पडली की तो सारे अवसान गळून गेल्यासारखे होई आणि त्या राक्षसीच्या जबडयात अलगद येऊन पडे. मारुतीच्या हे लक्षात आले. त्याने तिचे मर्मस्थान शोधले आणि तिचा नाश करून थेट लंका गाढली. मारुतीरायाने आपल्या तीक्ष्ण बुद्धीमत्तेची चुणूक अशी वारंवार दाखविली आहे.

मारुती लंकेत शिरला. वेशीत त्याला लंकिनी नावाची देवी आडवी आली. तिने त्याला प्रश्न केला, कोण रे तू ? मारुतीने त्याचे उत्तर काहीही न बोलता वज्रमुष्टी प्रहाराने दिले. बिचारी रक्त ओकत बसली. मारुती लंकेत सर्वत्र संचार करू लागला. सूक्ष्मरुप धारण करून त्याने रावणाच्या अंतपुरात प्रवेश केला. तिथे त्याने त्याचा आहार, विहार, वस्त्रागारे, शस्त्रागारे, मंत्रणागृह, छावणी इत्यादीबाबत सर्व सूक्ष्म माहिती मिळविली आणि सीतामाईला धुंडत तो पुढे निघाला. तिथे त्याला एका झोपडीत रामभक्त बिभीषणाची गाठ पडली. दोघे जीवेभावे एकमेकांना भेटले आणि बिभीषणाकडून अशोक वनाचा पत्ता घेऊन मारुती अशोक वनात आला. तिथे त्याने सीतामाईची भेट घेतली. तिला प्रभूरामचंद्राची मुद्रिका दिली. आपली ओळख पटवली. सर्व हकीकत समजावून सांगितली आणि लवकरच प्रभू तुला नेण्यासाठी लंकेत येईल असे सांगून मारुती परत फिरला. तोपर्यंत हनुमान नावाचा कुणी वानर श्रीरामाचा दूत बनून लंकेत आला आहे आणि त्याने सीतामाईची भेट घेतली आहे ही वार्ता रावणाच्या कानी जाऊन पोहचली. रावण चिडला. त्याने मारुतीला पकडण्याची आज्ञा केली. तोपर्यंत मारुती लंकेच्या चैत्यप्रासादाशेजारी असलेल्या देवीच्या रम्य मंदिरावर येऊन बसला होता. प्रहस्त पूत्र जंबूमाळी सहा धिप्पाड गाढवांच्या रथात बसून मारुतीवर चाल करून आला. मारुतीवर त्याने अर्धचंद्र आणि नाराच हे बाण सोडले. त्या बाणांच्या माराने मारुतीचे डोकेच फिरले. त्याने भलीमोठी शिळा उचलून जंबूमाळीवर फेकली. जंबूमाळीने आपल्याकडील बाण चालवून त्याच्या ठिकऱ्या केल्या. परंतु त्याचा परिणाम मात्र उलटाच झाला. त्या शिलाखंडाच्या तुकडयांनी अगणित राक्षस सैन्य मरून पडले. जंबूमाळी चिडला. त्याने प्रभावी सात बाण मारुतीवर सोडले. त्याला उत्तर म्हणून मारुतीने चैत्य प्रासादाचा आडसरच उपटून जंबूमाळीवर फेकला. जंबूमाळीच्या शरीराचा चुराडा झाला. मारुतीने आपल्या पायाच्या रेटयाने त्याला धरणीमातेच्या उदरात लोटले.

जंबूमाळीचा मारुतीने वध केल्याचे कळताच रावण संतप्त झाला. त्याने आपल्या सात मंत्र्याच्या सात पुत्रांना मारुतीवर चाल करून जाण्यास सांगितले, परंतु तेही प्राणास मुकले. तेव्हा रावणाने आपले सेनापती विरुपाक्ष, यूपाक्ष, दुर्धर, प्रहास आणि भासकर्ण यांना ससैन्य मारुतीवर सोडले. त्यांच्या चतुरंग सेनेने मारुतीला घेरले. त्यावेळी मारुती प्रमदावनाच्या दाराशी होता. त्याने या सैन्याची अक्षरशः राळ उडवून टाकली. तेव्हा रावणपुत्र अक्षयकुमार पुढे झाला. अक्षयकुमाराने मारुतीवर बाणांचा वर्षाव सुरू केला. ते बाण म्हणजे शरीरात रुतलेले एखादे कुसळ समजून मारुतीने बाजूला फेकून दिले. मारुतीने त्याच्यावर मोठमोठ्या शिळा टाकल्या. अक्षयकुमार हतबल झाला. मारुतीने त्याला पकडले. गरगर फिरवले आणि एका मोठ्या शिळेवर भोपळा आपटावा तसे आपटले. अक्षयकुमाराच्या देहाच्या चिंधड्या झाल्या. हे पाहून सारे राक्षस सैन्य पळत सुटले.

ही वार्ता ऐकताच मेघनाद पुढे झाला. मारुतीचे आणि त्याचे तुंबळ युद्ध झाले. त्या धक्काबुक्कीत मेघनाद जेरीस आला तरीही मारुती ऐकत नाही हे पाहताच त्याने त्याच्यावर ब्रह्मपाश टाकला. ब्रह्मदेवाचा मान राखण्यासाठी मारुतीने स्वतःला ब्रह्मपाशात गुरफटून घेतले. मेघनादाने त्याला रावणाच्या दरबारात आणले. तिथे मोठमोठे देव, लोकपाल, दशदिशांचे संरक्षक राजे रावणापुढे हात जोडून उभे होते. तेजोभंग झालेला सूर्य तिथे उभा होता. वायुदेव रावणाला पंखा वारीत होता तर अग्निदेव रावणाच्या आज्ञेची वाट पाहत तिष्ठत उभा होता. मारुतीला हे सारं पाहून असह्य झालं. त्याला आपला राग अनावर झाला. अशा ह्या दरबारात तोच एक मात्रवीर छाती पुढे काढून ताठ मानेने हाताच्या मुठी वळवून त्या दरबारात उभा होता.

त्याला अशा रुबाबात उभा राहिलेला पाहताच रावण खवळलाच आणि रागातच गरजला. कोण रे तू ? एवढा उत्पाद मांडला होतास तो कशाच्या जोरावर !

मारुतीने त्याला तितक्याच रुबाबात उत्तर दिले. ऐक रावणा, ''अखिल ब्रह्मांडाचा आधार जो ॐकार तोच माझा जोर'' मला रामदूत हनुमान म्हणतात. मी माझ्या ध्येय पुरुषापुढेच फक्त हात जोडतो. इतरांपुढे तसे करण्याची मला गरजच वाटत नाही. खर, दुषण, भिशिरांसह चौदा हजार सेनेचा ज्याने फडशा पाडला, वालीसारख्या बलाढ्य वीराला ज्याने यमसदनाची वाट दाखवली त्या महाप्रतापी श्रीरामाला तू ओळखत नाहीस काय ? त्यांच्यापुढे तू तर कस्पटासमान आहेस, अरे तू तर एक पळपुटया चोर आहेस म्हणून तर रामाच्या गैरहजेरीत बैराग्याच्या वेशात जाऊन तू त्यांची

बायको पळवून आणलीस हे मला माहित नाही असं वाटतं की काय तुला ?

मारुतीचे हे निर्भिड बोलणे ऐकून राक्षसांचा तो दरबार क्षणभर भयचकीत नजरेने पाहू लागला. मारुती पुढे म्हणाला, ऐक रावणा, मला भूक लागली होती, म्हणून मी तुझ्या बागेतील फळे तोडून खाल्ली हे खरे आहे. परंतु एवढ्याशा कारणावरून तुझ्या सेवकांनी मला भरपूर मारपीट केली म्हणून केवळ स्व संरक्षणार्थ मी त्याला प्रतिकार केला त्यात माझे काय चुकले ?

राजा रावणा, तुला तुझ्या हिताची गोष्ट सांगतो ऐक. सीतामाईला तू जशी आणलीस तशीच पुन्हा श्रीरामाचे चरणी नेऊन सादर कर. तो दयाळू आहे. तुझा अपराध तो दयाघन निश्चितपणे क्षमाच करील. अरे, माझे ऐक. तू रामाच्या भजनी लाग आणि निर्धास्तपणे या लंकेचे राज्य भोग. तुझी संपत्ती, शक्ती, विद्वता, कुलीनपणा हे सारे या वृथा अहंकाराच्या मागे लागल्याने वाया जात आहे.

(शत्रूपक्षाच्या राज्यात जाऊन चहू बाजूने बलाढ्य शत्रूच्या घेऱ्यात घेरला गेला असतानाही वीर हनुमंताचे हे भाषण त्याचे शौर्य, बुद्धीमत्ता, नीती, स्वामीनिष्ठ भक्तीभाव याचं उत्कृष्ठ दर्शन घडविणार आहे. समाजामध्ये आजही जागोजागी असे कित्येक रावण दबा धरून बसलेले आहेत. म्हणून आजही रामायण पुन्हा पुन्हा अभ्यासण्यासारखं आहे. आजही त्याची फार उपयुक्तता आहे.)

अहंकारी रावणाने मारुतीचे हे भाषण ऐकताच त्याच्या अंगाचा तीळपापड झाला. त्याने मारुतीला ताबडतोब मारुण टाका अशी आपल्या सेवकांना आज्ञा केली. हे ऐकताच रावणबंधू रामभक्त बिभिषण पुढे झाला आणि म्हणाला, महाराज, मारुती हा रामदूत आहे आणि दूताचा वध करणे हे राजनीतीला सोडून आहे. तसेच ते माणूसकीला शोभून दिसणारे नाही.

बिभीषणाच्या या भाषणाचा दुष्ट रावणाच्या मनावर थोडा तरी परिणाम झालेला दिसला. त्याने आपला पहिला हुकूम बदलला आणि मारुतीच्या शेपटीला चिंध्या गुंडाळून त्याची शेपटी पेटवून देण्याचा हुकूम केला. राक्षसांनी रावणाचा हुकूम आमलात आणला. मारुती शांतपणे उभा राहून हे सारं करून घेत होता. राक्षसांनी आपलं काम केलं आहे असं पाहताच मारुतीने उडी मारली आणि एका घरावर जाऊन बसला. ते घर पेटलं आहे असं पाहताच दुसऱ्या घरावर गेला. असं करत करत मारुतीने अर्धी अधिक लंका जाळून टाकली.

मारुती परत फिरला. श्रीरामांना येऊन भेटला. घडली हकीकत जशीच्या तशी त्याने श्रीरामांच्या कानी घातली. रामाने पुन्हा सर्वांना एकत्र बोलावले. विचारविनिमय केला आणि सर्वानुमते लंकेवर चाल करून जायचे ठरले. रामाची वानरसेना दक्षिण दिग्वीजयासाठी सिद्ध झाली. मजल दरमजल करीत रामसेना सागराच्या ऐलतीरी रामेश्वराजवळ येऊन पोहचली. सागरतीरी सैन्याचे डेरे पडले. ही वार्ता लंकेत बिभीषणाला समजताच तो रामभक्त लंकेतून आकाशमार्गे येऊन रामाला भेटला. श्रीरामाला अनन्य भावे शरण आला. त्याच्याकडून श्रीरामांना बऱ्याच गुप्त वार्ता कळल्या.

रामसेना लंकेत जाऊन उतरली. सैन्याचे मोर्चे बांधले गेले. पश्चिम वेस सांभाळण्याचे काम मारुतीवर सोपविण्यात आले. नुकतीच अर्धीअधिक लंका भस्मसात करून आणि महाबलाढ्य वीरांना यमसदनाची वाट दाखावून गेलेला मारुती पुन्हा रणांगणावर उभा ठाकलेला पाहताच राक्षस सैन्यांची गाळण उडाली. पश्चिम वेशीवर उभ्या असलेल्या मारुतीवर रावणाने त्याचा महाबलाढ्य वीर धुम्राक्ष सोडला. त्याने हनुमंताच्या राम सेनेवर कडाडून हल्ला चढवला. मारुतीने हे पाहताच त्याच्यावर प्रचंड शिळा आणि वृक्षांचा भडीमार केला. त्यामुळे धुम्राक्षाचा रथ छिन्न भिन्न झाला. आता धुम्राक्षही चवताळला. त्याने काटेरी गदा हाती घेऊन मारुतीवर चाल केली. हे पाहताच मारुतीने त्याच्या अंगावर प्रचंड शिळा टाकली.त्याबरोबर धुम्राक्ष क्षणात परलोकवासी झाला. धुम्राक्ष पडला हे पाहताच अकंपन नावाचा राक्षस योद्धा पुढे झाला. अकंपन आणि मारुती यांचे तुंबळ युद्ध सुरू झाले. अकंपन बाणांचा वर्षाव करीत होता, तर मारुती प्रचंड शिळा आणि वृक्षांचा मारा करीत होता. अकंपन फारच चेकाळलाय असं पाहताच मारुतीने एक प्रचंड वृक्ष उपटला, तो गोफणीसारखा गरगर फिरवला आण अचूकपणे अकंपनाच्या डोक्यावर मारला. अकंपन पडला. दोन महायोद्धे कामास आले हे पाहून रावणाचा भाऊ कुंभकर्ण युद्धभूमीवर आला. त्याचाही फडशा उडाला तेव्हा त्याचा मुलगा कुंभ पुढे झाला. परंतु वानरराज सुग्रीवाने त्याला क्षणात यमसदन दाखविले हे पाहताच महाबलाढ्य निकुंभ रणात उतरला. त्याने रणांगणी मोठाच धुमाकुळ घातला ही वार्ता मारुतीला कळताच मारुती धावून गेला. दोघांचे तुंबळ युद्ध झाले. मारुतीच्या वज्रमुठीचा प्रसाद मिळताच निकुंभ घायाळ झाला. मारुती त्याच्या छातीवर बसला आणि त्याचं मुंडकं धरून पिरगळू लागला. निकुंभ मेलो मेलो असे ओरडू लागला, परंतु मारुतीचे तिकडे लक्षच नव्हते. त्याने निकुंभाचे मुंडके पिरगळून, पिरगळून धडापासून उपटून काढले आणि राक्षस सैन्यामध्ये फेकून दिले. राक्षस सैन्यात घबराट माजली. जो तो वाट मिळेल तिकडे जीवाच्या भितीने पळत सुटला.

या युद्धात वानरसेना बलाढ्य ठरते आहे असं चित्र दिसू लागताच रावणानें पुन्हा एकदा राक्षसी मायावी शक्तीचा कपट-डाव रचला. वेळ रात्रीची होती. सारे सैन्य छावणीत झोपले होते. मारुती मात्र पहारा देत बसला होता. इतक्यात

बिभिषणाचा वेष धारण करून कपटी अहीरावण तिथे प्रगट झाला. मारुतीने त्याला आडविले. त्यावर तो वेषधारी राक्षस म्हणाला. मला प्रभूनी बोलावले आहे. प्रभूंचा निरोप आला त्यावळी मी संधेला गेलो होतो. त्यामुळे उशीर झाला. मला आत जाऊ दे. प्रभू माझी वाट पाहत असतील. मारुतीने त्या कपटी राक्षसाला न ओळखल्यामुळे त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि त्याला आत सोडला. या संधीचा फायदा घेऊन अहिरावणाने राम आणि लक्ष्मणाचे हरण केले आणि तो त्यांना पाताळात घेऊन गेला.

मारुती लगेचच अहिरावणाचा शोध घेत निघाला. वाटेत त्याला समजून चुकले की अहिरावण रामलक्ष्मणाला पाताळात नागलोकी घेऊन गेलाय. मारुती नागलोकांत आला, तो राजवाड्याशी दाराशी मकरध्वज उभा. मारुतीच्या घामापासून हा निर्माण झालेला मकरपूत्र दोघेही स्वामीनिष्ठ. दोघांची खूप लढाई झाली. त्यात मकरध्वजाचा पराभव झाला आणि हनुमान आत घुसला. समोर देवी होती. हनुमानाने देवीचा मुखवटा स्वत:च धारण केला आणि देवीच्या जागी जाऊन आपणच उभा राहिला. थोड्या वेळाने राम लक्ष्मणाला तिथे आणले गेले. राक्षसगण आनंदाने नाचत होते. आज ते राम लक्ष्मणाचा देवीला बळी देणार होते. मारुती सारं काही एका जागेवरून पहात होता. राम लक्ष्मण जवळ येताच मारुतीने उडी मारली. एकेका राक्षस वीराला लोळवायला सुरुवात केली आणि सगळ्यांची दाणादाण उडवून राम लक्ष्मणाला घेऊन बल भीम मारुती पुन्हा स्वस्थानी परत आला.

दुसऱ्या दिवशी रणांगणावर राम लक्ष्मणाला पाहताच रावणाला आश्चर्यच वाटले आणि आपली ही युक्तीसुद्धा फसली हे कळून चुकले. निकराचे आणि तुंबळ युद्ध जंपले. वानर सैन्य ऐकत नाही असे पाहताच रावण पूत्र इंद्रजिताने नागबंध प्रयोग केला. त्यात राम लक्ष्मण दोघेही आडकले. हे पाहताच हनुमान गरुडाकडे धावला. त्याबरोबर गरुड खाली उतरून आला. गरुडाला पाहताच सारे नाग सैरावैरा पळत सुटले आणि राम लक्ष्मण मोकळे झाले. रावणाला ही हकीकत कळताच त्याने धुम्राक्ष नावाच्या महापराक्रमी राक्षस सेनापतीला वानरसेनेवर तुटून पडण्यास फर्माविले. धुम्रास रणागणावर आलेला पाहताच मारुती पुढे आला. त्याने मोठमोठ्या शिलाखंडाचा त्याच्यावर मारा सुरू केला. त्यात धुम्राक्षाचा चक्काचूर झाला. इतर राक्षस सैन्याचा जाबुवंतादी महावीरांनी खरपूस समाचार घेतला. धुम्राक्ष मारला गेलेला पाहताच रावणाने वज्रदंष्ट्रासारखा कर्दनकाळ पुढे केला. मारुतीने त्यालाही क्षणात धुम्राक्षाच्या भेटीला पाठविले. अकंपन नावाच्या राक्षसवीराचीही मारुतीने तीच गत केली.

अशा प्रकारे सर्व बलाढ्यवीरांचा निप्पात झालेला पाहताच खवळलेला रावण स्वत:च युद्धभूमीवर येऊन उभा राहिला. दोघांचे तुंबळ युद्ध सुरू झाले. लक्ष्मण आपणास भारी पडणार असे वाटताच मायावी रावणाने लक्ष्मणावर एक शक्तीअस्त्र सोडले. त्याबरोबर लक्ष्मण घायाळ होऊन धरणीवर पडला. रावण त्याला उचलून लंकेत नेण्याच्या विचारात होता. इतक्यात मारुतीने तिथे येऊन रावणाच्या छातीवर जोरदार वज्रमुष्ठी प्रहार केला. त्याबरोबर रावण रक्त ओकू लागला. मारुतीने चपळाई करून लक्ष्मणाला उचलला आणि रामाजवळ आणून ठेवला. थाड्या वेळाने लक्ष्मण सावध झाला आणि पुन्हा रणभूमीवर आला. परंतु तोवर रावण रणभूमीसोडून निघून गेला होता. त्याची जागा आता देवांतक, त्रिशीरा आणि अतिकाय या राक्षस योद्धयांनी घेतली होती. त्यापैकी अतिकायाला लक्ष्मणाने घायाळ करून सोडला आणि देवांतक व त्रिशिरा यांना मारुतीने घायाळ केले. परंतु काही झालं तरी ते सामान्य योद्धे नव्हते. त्रिशीरा महाबलाढ्य ठरला. मारुतीला त्याच्याशी निराचे युद्ध करून त्याची तिन्ही मुंडकी धडावेगळी करावी लागली. या तिनही वीरांना विरगती प्राप्त झालेली पाहताच रावणाने आपला पुत्र इंद्रजित याला रणांगणावर पाठविले. त्याने जांबुवंताला घायाळ केले आणि लक्ष्मणासमोर तो येऊन उभा राहिला. लक्ष्मण मारुती आणि इंद्रजित यांचे युद्ध सुरू झाले. त्यात इंद्रजिताने आपल्या आजोबाकडून मयासूराकडून मिळालेली अमोघ शक्ती लक्ष्मणावर सोडली. तत्क्षणीच लक्ष्मण धरणीवर पडला. मारुतीने पुन्हा उचलून त्याला रामाजवळ नेले. लक्ष्मण गेला असे समजून राम शोक करू लागले. तेवढ्यात तिथे सुग्रीवाचे सासरे महावैद्यराज सुषेण येऊन दाखल झाले. त्यांनी लक्ष्मणाची नाडी पाहिली आणि रामाला समजावीत ते म्हणाले, प्रभू लक्ष्मण केवळ बेशुद्ध पडलाय. त्यासाठी एवढा शोक करून कसे चालेल. अहो ही लढाई आहे असं व्हायचंच. सुषेणाच्या या भाषणाने रामाला धीर आला. त्यांनी विचारलं, आता याला उपाय काय ? सुषेण म्हणाले, याला उपाय आहे. संजीवनी वल्लीने ही मुर्च्छा जाते. विशल्यकरणीच्या रसाने शरीरात गेलेली बाणांची टोके बाहेर काढता येतात आणि सुवर्णकरणी व संस्थनी या वनस्पतीच्या रसाने जखमा ताबडतोब भरून येतात. या चारी वनस्पती द्रोणागिरीवर आहेत. सूर्योदयापूर्वी त्यांचा रस काढला तर तो गुणच गुण देतो.

सुषेणाचे भाषण ऐकून श्रीराम विचारात पडले. आता या वनस्पती इतक्या लांबून आणणार कोण ? रामांना चिंतामग्न पाहून चाणाक्ष मारुती चटकन उठला आणि म्हणाला, प्रभू इतकचं आहे ना. हा पहा निघालो मी. सारा द्रोणागिरीच आणून ठेवतो इथे. मग घ्या हवी ती वनस्पती निवडून. रामाला धीर आला. मारुतीने उड्डाण केले आणि तो द्रोणागिरीवर आला. औषधी वनस्पतींनी भरलेला द्रोणागिरीचा भाग त्याने उपटून

हातात घेतला आणि तो जाऊ लागला. इतक्यात कालनेमी नावाचा दैत्य तिथे अवतीर्ण झाला. त्याने मारुतीच्या या कामात अनेक विघ्ने निर्माण केली, परंतु मारुतीने सर्वांचे हरण करून आपला पल्ला शेवटी गाठलाच. मारुती संजीवनी घेऊन आलेला पाहताच सारे आनंदाने नाचू लागले. सुषेणाने वनस्पतीचा रस काढून लक्ष्मणाला शुद्धीवर आणला.

दुसऱ्या दिवशी सूर्योदयी पुन्हा युद्धात सुरुवात झाली. काल आपल्या शक्तीने घायाळ झालेला आणि त्यातून वाचू न शकणारा लक्ष्मण युद्धभूमीवर युद्धासाठी सज्ज होऊन, धनुष्याला बाण लावून उभा आहे असे पाहताच इंद्रजित चक्रावूनच गेला. त्याला क्षणभर काय करावे हेच सुचेना. लक्ष्मण सरळ सरळ इंद्रजितालाच जाऊन भिडला. मागे मारुती होताच. इंद्रजित आणि लक्ष्मण यांचे तुंबळ युद्ध झाले आणि अखेर इंद्रजित मातीला मिळाला.

इंद्रालाही नामोहरम करणारा आपला पुत्र मारला गेला हे पाहताच रावण रागाने लालीलाल झाला. बेभान झाला, बेताल बनला, रावणाचा तो आक्राळविक्राळ अवतार पाहताच युद्धासाठी स्वत: श्रीराम रणांगणावर आले. लक्ष्मणाला त्यांनी मागे केले आणि श्रीराम दुष्ट रावणाशी सामना द्यायला सिद्ध झाले. रावण सुसज्ज अशा रथात बसून लढत होता तर प्रभू रामचंद्र मात्र जमिनीवर उभे राहूनच युद्ध करीत होते. अटीतटीचे असे ते महाभयंकर रण पेटले होते. मारुती हे लांबूनच राहत होता. रथातील रावणाशी प्रभूंनी जमिनीवरून सामना द्यावा हे त्याला पटेना. तो चटकन पुढे झाला आणि त्याने प्रभू रामचंद्रांना अलगद खांद्यावर घेतले. आता खरा राम रावणाचा आमोरासामोरा सामना सुरू झाला. रावणाचा सारथी जसा मोहरा करी त्याच तोडीचा मोहरा मारुतीने सुरू केला. मारुतीचे चपळ शरीर विद्युल्लतेप्रमाणे वळू लागले. मारुतीचे चपळख पवित्रे अतिवेगाने सुरू झाले. श्रीरामही त्याच चपळाईने रावणाशी झुंज देऊ लागले.

रावणाच्या बंदीवासात आडकून पडलेल्या देवांसाठी श्रीरामाने रावणाशी मांडलेले हे महाभयानक युद्ध देव स्वर्गातून पाहत होते. श्रीरामाच्या जीवाला जीव देणारी मारुती श्रीरामांकडे रथ नाही म्हणून स्वत: त्यांना खांद्यावर घेऊन रणात झुंजतोय हे पाहून देवराजा इंद्र अखेर शरमलाच. त्याने आपला सारथी मातली याला हाक मारली आणि आपला विजयी रथ भूतली श्रीरामासाठी घेऊन जाण्याची आज्ञा केली. क्षणात मातली इंद्ररथ घेऊन श्रीरामापुढे हजर झाला. श्रीराम मरुतपुत्रांच्या मारुतीच्या खांद्यावरून उतरले आणि इंद्र रथांवर चढले. कधी कुणी पाहिलं नव्हतं असं पृथ्वीवर महाभयंकर तुंबळ युद्ध माजलं. दहा दिवस श्रीराम निकराने लढले आणि अखेर मातलीच्या सल्ल्यानुसार श्रीरामाने आपल्या भात्यातून एक दिव्य बाण काढून रावणाच्या हृदयाचा वेध घेतला. रावण पडला. लंकेवर वानर सेनेचा विजय झाला.

विजयी श्रीरामानी लंकेत प्रवेश केला. सीतामाईला ही वार्ता सांगण्यासाठी मारुती उतावीळ झाला होता. अखेर श्रीरामाची अनुज्ञा घेऊन तो लगबगीने अशोक वनात सीतामाईपुढे येऊन उभा राहिला. सारी घडलेली हकीकत त्याने सीतेच्या कानी घातली. श्रीराम विजयी झाल्याने आणि ते लंकेत आल्याचे सांगितले. सारं ऐकून सीतेचे उर भरून आला. ती म्हणाली, हनुमंता या सर्व कार्यात तुझा वाटा फार मोलाचा आहे. अशोक वनात श्रीरामांचा पहिला संदेश तूच घेऊन आला होता आणि आज श्रीरामांच्या विजयाची वार्ताही तूच घेऊन आलास. बोल बाळा काय देऊ मी तुला ?

श्रीरामाचा एकनिष्ठ सेवक मारुती चटकन उत्तरला, 'माते तुझे वत्सल आणि मंगल आशीर्वाद' तेवढेच फक्त मला दे.

卐卐卐

## तव नामाची अखंड धून

तव नामाची अखंड धून  
भरून राही मनामधून  
श्री साई, जयसाई  
श्री साई, जयसाई ॥

चराचरावर तुझी छाया  
जग अवघे तुझी माया  
दिक्कालाचे चक्र चालते  
तूच फिरविशी त्यास धरून

तनात तू मनात तू  
फुलात तू जलात तू  
तूच बनविशी मेघ आणखी  
तूच बरसशि मग त्यातून

तूच पिता, तू आई  
तूच दत्त, तू गुरुसाई  
सबुरी आणि विश्वासाचा  
मंत्र शिकविशी मित्र बनून

सबका मालिक एक असे  
भिन्नत्वाला स्थान नसे  
दहा दिशांवून दहा रुपातून  
प्रचिती देशी फिरून फिरून


जो जे मागे तया मिळो  
हर्षाने जीवन उजळो  
अल्ला तेरा भला करेगा  
जाशी कुठे अन् येशी कुठून

**– प्रसाद कुलकर्णी**

# सामर्थ्य संपन्न प्राचीन स्तोत्र विष्णुसहस्त्रनाम

परमहंस स्वामी वरदानंद भारती

— ❖ ❖ ❖ —



**एकदा श्रीसाईबाबांच्या छातीमध्ये दुखत होते तेव्हा बाबांनी लाडका भक्त शामास विष्णुसहस्त्र नामाची पोथी आणण्यास आज्ञा केली व ती पोथी त्यांनी छातील लावताच त्यांना आराम पडला, छातीतील दुखणे थांबले अशी एक कथा श्रीबाबांच्या अनंत लीलांमध्ये सांगितली जाते.**

**श्री बाबांच्या या लीलेवरून श्रीविष्णुसहस्त्रनाम पोथीची थोरवी. व सामर्थ्यसंपन्नता लक्षात येते.अशा विष्णुसहस्त्रनामांना परमहंस स्वामी परदानंद यांनी केलेले भाष्य -**

**ही पोथी नुकतीच श्रीसाईबाबा संस्थान शिरर्डीच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेली आहे.**

— ❖ ❖ ❖ —

अत्यंत प्रभावी आणि सामर्थ्यसंपन्न म्हणून प्रसिद्ध असलेल्या स्तोत्रामधें श्रीविष्णुसहस्रनाम हे एक महत्त्वाचे स्तोत्र आहे. त्यात भगवंताच्या एकसहस्र गुणवाचक नावाचा उल्लेख आहे. पांचसहस्राहून अधिक वर्षे या परमपावन स्तोत्राने कोटयावधि व्यक्तिंचे कल्याण साधून दिलेले आहे. या विष्णुसहस्रनामाच्या श्रवण - पठण - चिंतनानें मनुष्य सर्व संकटांतून तरून जातो आणि आपले मनोरथ सिद्धीस नेऊ शकतो. या स्तोत्रांतील शब्दाशब्दांतून अशुभ नाहीसे करणारी परममंगल अशी मंत्रशक्ती भरलेली आहे असा अनेक संतमहात्म्यांचा आणि प्रज्ञावंतांचा अनुभव आहे. अर्थदृष्टीनेही हे स्तोत्र नित्यनूतन असून मनुष्याला सर्व प्रकारे मार्गदर्शन करणारे आहे.

विष्णुसहस्रनाम या स्तोत्रातील अनेक नामें समानार्थक आणि पुनरुक्त वाटली तरी समानार्थक नावात अर्थछटांचा सूक्ष्म भेद असतो तर काही पुनरुक्त नावात अर्थभेदच असतो. काही पुनरुक्त नावे वर्णाच्या विशिष्ट क्रमाने मंत्रशक्ति वाढविण्यासाठी स्वीकारलेली आहेत, असेही समजता येते. यातील नावे ऐतिहासिक चरित्र सांगणारी, रूपाचे वा अवयवाचे सौंदर्य किंवा वैशिष्टय प्रगट करणारी, भगवंताची वत्सलता व्यक्त करणारी अशी आहेत. यातील प्रत्येक नाव हे कोणातरी साक्षात्कारी महात्म्याला, द्रष्टया ऋषीला त्याच्या तपस्येच्या बळावर स्फुरलेले आहे व ते श्रद्धा-भावाला अनुकूल ठरून अंत:करणाला आकर्षक वाटल्याने त्याने प्रचारात आणलेले आहे. त्या त्या मानाने त्या त्या व्यक्तिचा सर्वतोपरी उद्धार साधून दिलेला आहे. भीष्माचार्यांनी तीच नावे धर्मराजास सांगितली आणि भगवान व्यास महर्षींनी ती संकलित करून संपादित करून कल्याण-साधन म्हणून जगताच्या हाती दिली. ही नावे एकेका गुणाचे वर्णन करणारी आहेत. ब्राह्मणादि चारी वर्ण, ब्रह्मचर्यादि चारी आश्रम, धर्मादि चारी पुरुषार्थ आणि कर्म - भक्ति - ज्ञान - योग असे चारी साधनामार्ग, हे जे वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाचे आधार, ज्यामुळे व्यक्ति, समाज, आणि राष्ट्र उन्नति-प्रगति-विकास साधून घेऊ शकते, त्यांना आवश्यक असणारे सर्व सद्गुण या विष्णुसहस्रनामाच्या स्वरूपात साधकापुढे उघड केले गेले आहेत. या गुणवाचक अर्थावर लक्ष केंद्रित करून त्याचे चिंतन-मनन केले, ते गुण आपल्या जीवनामधे मुरतील, आचारांत प्रगट होतील असा जर प्रयत्न त्या त्या परिस्थितीत असलेल्या मानवाने यथाशक्ति यथामतीच पण प्रामाणिकपणे केला तर त्याचे कोटकल्याण झाल्याविना राहणार नाही इतके माहात्म्य या परमपावन स्तोत्राचे आहे.

आयुर्वेदाच्या चरकसंहितेसारख्या श्रेष्ठ प्राचीन ग्रंथाने विष्णुसहस्रनामाचे ठिकाणी ज्वरादि व्याधि दूर करण्याचे सामर्थ्य असल्याचे आवर्जुन सांगितले आहे आणि ते यथार्थ आहे असा अनेकांचा अनुभव आहे.

विष्णुसहस्रनामाचे बारा पाठ प्रतिदिनीं करणे हे अत्यंत प्रशस्त

मानले जाते. पण इतका वेळ देणे ज्यांना खरोखरीच शक्य नाही, त्यांनी आठ-पाच-तीन निदान एक पाठ तरी प्रतिदिनी करावाच. त्यामुळे त्याला शारीरिक मानसिक आणि ऐहिक लाभही होत राहतील हे निश्चित. निष्काम मनाने शक्यतो शुद्ध होऊन व राहून भगवंताकडे लक्ष केंद्रित करून विष्णुसहस्रनामाचा पाठ करणे यासारखे मनाला शांतता, समाधान, प्रसन्नता देणारे दुसरे साधन खरोखरीच नाही. दिवसाकाठी एकादा-दुसरा पाठ तरी याप्रमाणे करावा.

केवळ यांत्रिकपणे इतर काही उद्योगात असतानाही विष्णुसहस्रनाम म्हणत राहणे हे लाभदायकच आहे. आदर्शपणे चागले काही करता येत नसेल तर जेवढे करता येते तेवढे तरी निरलसपणे करीत राहणे हेही चांगलेच आहे. मन लागणे, मन रमणे, ते एकाग्र होणे, श्रद्धा दृढावणे, भाव प्रगट होणे या गोष्टी साधनमार्गांत फार शेवटी प्राप्त होणाऱ्या आहेत. त्यासाठी दीर्घकालाची तपस्या आवश्यक असते. साधनमार्गांत आरंभीच हे लाभण्याची शक्यताही नसते. तेव्हा त्यासाठी अडून राहू नये. मन चंचलपणा सोडीत नसले तरी अगदी यांत्रिकपणे केलेले विष्णुसहस्रनामाचे पठणही लाभदायकच होते. मन लागणाऱ्यापेक्षा न लागणाऱ्याला अनुभव येण्यासाठी बराच काळ धीर धरावा लागतो इतकेच.

आवश्यक आणि अनावश्यक अशा गोष्टींचे तारतम्य राखून अनावश्यक ते शरीराच्या - मनाच्या - बुद्धीच्या पातळीवरही जितके काढतां टाळतां येईल तेवढे प्रयत्नपूर्वक टाळीत गेले म्हणजे नको ते ओझे हलके होत गेल्याने मनालाही शांत प्रसन्न होण्याच्या दृष्टीने अधिकाधिक वाव मिळतो, हे लक्षात घेऊन वागावे आणि मिळेल तेवढा अधिक वेळ या नामस्मरणासाठी द्यावा.

परमेश्वर आणि त्याचे नाव एकरूपच आहेत. नाम आणि नामी यांत भेद नाही, असे स्वानुभवी संतमहात्म्यांनी वारंवार सांगितले आहे. म्हणून भाविकांनी तरी श्रद्धा ठेवून विश्वासाने ही नामजपाची साधना करीत राहावी. 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' आणि 'न हि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति' हे जे भगवद्गीतेमध्ये भगवंतांनी दिलेले आश्वासन आहे त्यावर भरवसा ठेवून चालावे.

साधनेमध्ये दुर्बलता हा मोठा अपराध मानण्याचे कारण नाही. कारण प्रकृति परिस्थितिप्रमाणे साधकाचे सामर्थ्य त्याचे शारीरिक, मानसिक वा बौद्धिक बल उणे-अधिक असू शकते. तो खरा दोष नाही. साधनेतील खरा अपराध आहे, आळस, अनादर आणि उपेक्षा. हे दोष ठेवू नयेत आणि साधना करीत राहावे. फल निश्चित मिळेल अस संतांनी प्रतिज्ञापूर्वक सांगितलेले आहे. या सर्व वस्तुस्थितीमुळे विष्णुसहस्रनाम हे एक सर्वजनसुलभ सर्वोपयोगी असे उत्कृष्ट साधन आहे. कुलवंताच्या कुटुंबात याचा एक तरी पाठ सामुदायिकपणे एकत्र बसून स्पष्ट शांत - गंभीर अशा स्वरांत नित्य व्हावा. उत्सव - महोत्सवात वा धार्मिक कृत्यांत एकत्र येणाऱ्या सर्व भाविकांनी असा पाठ समुदायाने करावा. ते फार फार लाभदायक आहे. त्यामुळे सर्व प्रकारची अनुकूलता निर्माण होऊन शांततेला, प्रसन्नतेला बाधक होणाऱ्या गोष्टी निश्चितपणे उणावत जातात.

विष्णुसहस्रनामाची रचना फार प्रासादिक आहे. त्यातील श्लोक मंद्र स्वरात संथ गतीने म्हणत राहिले तर शरीर-मनाला अननुभूत पण सुखावह अशा संवेदना आनंदित करीत राहतात. मनाला पीडणारे चिंता क्लेश उणावतात. नष्टहि होतात.

यातील काही शब्दसंहती मोठ्या लक्षणीय आहेत, फार बोधप्रद आहेत, उदाहरणार्थ काही शब्दसंहतींकडे लक्ष वेधतो.

**विश्वं विष्णु :–** सर्व विश्वच विष्णुरूप आहे. नारायणोपनिषदाने

''यच्च किंचित् जगत् सर्व दृश्यते श्रूयतेऽपि वा।
अंतर्बहिश्च तत् सर्वं व्याप्य नारायण: स्थित:''

हा जो संदेश दिला आहे याचा अर्थ आशय या दोन शब्दातच समाविष्ट झालेला आहे.

**भूतभव्यभवत्प्रभु :-** परमात्मा हा भूतभविष्यवर्तमानाचा स्वामी आहे. त्यामुळे कोणीही कसल्याही प्रकारच्या कर्तृत्वाचा गर्व बाळगण्याचे कारण नाही, हे लक्षात येऊ शकते.

**भोजनं भोक्ता –** उपनिषदाने 'अन्नं अन्नाद:' असे म्हणले आहे. अन्नही तोच आणि अन्न खाणाराही तोच. व्यवहारात हे द्वैत भासले तरी परिणामांत त्यांची एकरूपता आहे. हे प्रत्येकाच्या अनुभवास येणारे तत्त्व लक्षात घेतले की व्यवहारत: द्वैतांत राहूनही परमार्थत: अद्वैत जाणण्याचा मार्ग मोकळा होता आणि आपले हित (स्वार्थ नव्हे) साधून घेता येतो.

**महोत्साहो महाबल :–** ज्याचा उत्साह मोठा म्हणजे ज्याचे धैर्य टिकून राहते, जो आरंभशूर नाही, त्याचेच बळ मोठे ठरते.

**महाबुद्धिर्महावीर्य :–** ज्याची बुद्धि मोठी त्यालाच मोठे पराक्रम गाजविता येतात.

**अग्रणीर्ग्रामणी :–** नेता तोच जो सामान्यांतल्या सामान्यांत, खेडुतातल्या खेडुतात मिळून मिसळून राहतो.

**श्रीमान्न्याय :–** हा श्रीमंत आहे पण याची श्रीमंती न्यायाने मिळविलेली आहे.

**नेता समीकरण :–** हा चांगल्या प्रेरणा देणारा पुढारी आहे. (तो अनुयायांना वाटेल ती गुडंगिरी करण्यासाठी प्रवृत्त करीत नाही.)

**वसुदो वसु :-** याची श्रीमंती परोपकारासाठी उपयोगी पडणारी आहे, हा दाता आहे, केवळ स्वार्थासाठी संपत्ति साठविणारा नाही.

**सर्वलक्षणलक्षण्य :-** कोतेही लक्षण यालाच व्यक्त करते. ''तुका म्हणे जे जे बोला। ते ते साजे या विठ्ठला॥''

**सर्वदर्शी विमुक्तात्मा :–** याला सगळे काही कळते म्हणून हा कुठेच गुंतत नाही.

**मनोहरो जितक्रोध –** याने राग जिंकला असल्यामुळे हा सगळ्यांना हवाहवासा वाटतो.

**विशोकः शोकनाशन :-** स्वत: शोकरहित असल्यामुळे दुसऱ्याचा शोक सहजपणे नाहीसा करू शकतो.

**सद्गतिः सत्कृति :-** चांगले परिणाम होतात, कारण कृत्येंच चांगली असतात.

**अमानी मानदो मान्य :-** स्वत:ला मानाची अपेक्षा नसून इतरांना मात्र मान देतो आणि म्हणूनच तो सर्वांना मान्य होतो.

**नियन्ता नियमो यम :-** हा सर्वांचे नियमन करू शकतो. कारण तो स्वत:च यमनियमांचे यथायोग्य पालन करणारा आहे.

**अक्षोभ्यः सर्वप्रहरणायुध :-** प्रहार करण्यासाठी योग्य अशी सर्व प्रकारची आयुधें जवळ असूनही हा क्षुब्ध होणारा नाही, वृत्ती समतोल ठेवणारा आहे. विष्णुसहस्रनामाचा समारोप सर्वप्रहरणायुध: या नावाने झाला आहे. ते फार महत्त्वाचे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. विश्वाच्या परिपालनासाठी, न्यायाच्या संरक्षणासाठी, व्यष्टिसमष्टीच्या कल्याणासाठी अपरिहार्य होईल तेव्हा नीचांना आणि दुष्टांना शासन करण्याकरिता शस्त्र धारण करावेच लागते व त्याचा वापरही करावाच लागतो. अहंकारी संतापातून व्यक्त झालेली ही काही सूडबुद्धि नव्हे. म्हणून हा 'विश्वं विष्णुः' अक्षोभ्य असला तरी 'सर्वप्रहरणायुधः' आहे आणि 'सर्वशस्त्रभृतांवर' आहे. अशा बोधप्रद शब्दसंहति शोधल्या तर आणखीही सांपडू शकतील. उदा. विद्वत्तमो वीतभयः, चतुरस्रो गभीरात्मा इत्यादि. त्यावर चिंतन करणे हे जीवनपथावर प्रदीपासारखे उपयोगी पडणारे आहे.

वामन: प्रांशुः, अणुर्बृहत् कृशः स्थूलः, भयकृद् भयनाशनः, यज्ञान्तकृद् यज्ञगुह्य, अनिर्विण्ण: सदामर्षी इत्यादी परस्परविरोधी वा विसंगत वाटणारी नावे कधी भगवंताच्या व्यापकतेचे उद्‌बोधन करणारी असतात तर कधी परिस्थितिसापेक्ष अशा व्यष्टिसमष्टीधर्माची वैशिष्ट्ये व्यक्त करतात. येथील काही नावे जोडनावेही आहेत. निधिरव्यय:, धातुरुत्तम: येथे दोन शब्द मिळून एक संयुक्त नाम बनलेले आहे. संशोधनाच्या दृष्टीने या नामांच्या संख्येचा पुनरुक्तीचा वा संयुक्तता - विभक्ततेचा विचार करणे शक्य आहे, पण मी ते करीत नाही. तो माझा अधिकारही नाही.

अंतरंग - बहिरंगदृष्टीने विष्णुसहस्रनामाचा जो जो विचार करावा तो तो त्यातील महत्ता, दिव्यता आणि गंभीरता अधिकाधिक प्रत्ययास येते. मन कौतुकाने, आदराने, सद्‌भावनेने उचंबळून येते आणि बुद्धि परमात्म्याच्या अलौकिक अशा असीम तेजेस्वितेने स्तिमित होऊन विनम्र होते. होणारा हा लाभ असामान्य आहे.

**परमहंस स्वामी वरदानंद भारती**
कैलास आश्रम, उत्तरकाशी, (उ.प्र.)

# अमृतकण

## ७० वर्षापूर्वीच्या रामनवमीचा एक वृत्तांत

शके १८४७ व इ. स. १९२५ चा श्रीराम नवमीचा उत्सव.

श्री सच्चिदानंद - सद्गुरु-भक्त-मानस-राजहंस आधुनिक संतचुडामणी समर्थ श्री साईबाबा संस्थान शिरडी यांच्या पवित्र चरणी हकीगत सादर करितो की -

**आपल्या श्रीराम नवमीच्या उत्सवास अष्टमीस आरंभ होऊन पौर्णिमेस हनुमान जयंतीनंतर समाप्ती झाली. उत्सवाचे प्रमाण गेल्या वर्षापेक्षा चालू साली थोडे अधिक होते.** या साली माझा प्रिय शिष्य दामोदर वामन आठवले यास आपण पौष शु॥ १० स वैकुंठास श्री हरीच्या जवळ नेऊन ठेविले हे ठिकच झाले, पण त्याच्या लेकराबाळांचा सांभाळ करण्याची जबाबदारी म्हातारपणी माझ्यावर येऊन पडली आहे. तेव्हा या जबाबदारीला आपणाकडून सर्वतोपरी साहय असावे. तसेच चिरंजीव दामूचे नाव पंढरीक्षेत्रात अस्तित्वात राहावे या सद्हेतूने दामोदराश्रमात श्री साईबाबा आर्ययुनानी वैद्यकालय पंढरपुरच्या लोकांनी आपल्या मदतीवर उघडले आहे. त्या विद्यालयास रयतेकडून व दयाळू इंग्रज सरकारकडून योग्य प्रोत्साहन मिळून वैद्यकालय लोकसेवेस उत्तम प्रकारे समर्थ होईल असा आपला आशीर्वाद असावा. वैद्यकालयाची चहूबाजुंनी कृपाकटाक्षे करून भरभराट करावी.

या रामनवमी उत्सवास मुखेडे, उंबरी, मांजरम, बीड, हिंगोली, कळमनुरी, आजेगाव, माझोड, म्हैसा, पाथरी, शेलू, अहमदनगर, पुणे, बेळगांव, मिरज, मुंबई, खांडवा, अंधेरी वगैरे ठिकाणाहून लोक आले होते. **ज्यांचे येणे झाले नाही त्यांनी उत्सवाच्या खर्चाकरिता काही रकमा पाठविल्या.** तरी जे स्वत: आपल्या पवित्र चरणापाशी हजर राहिले व ज्यांनी द्रव्य साहय केले त्या सर्व लोकांचे आपण कल्याण करणारे आहातच. उत्सवास गोविंद महाजन चन्नया मुकावार यांनी स्वत: हजर राहून वाण्याच्या सामानावर देखरेख केली. श्रीमंत कृपासागर भवानराव बनसोडे इंदूर व रावसाहेब देव मामलेदार ठाणे हे उत्सवानंतर श्रीच्या दर्शनाकरिता येऊन उत्सवाचा प्रसाद घेतला. **जमाखर्चाचा खर्डा या पोटी ठेविला आहे. त्यात चुकभूल असल्यास त्याची माफी अज्ञ दासाला असावी व असेच सालोसाल या सकल संतांचा चरणरज जो मी दासगणू त्याच्या हस्ते सेवा घेत जावी.** आपल्या पवित्र उत्सवात माझ्या हातून जाणून न जाणून ज्या काही चुका झाल्या असतील त्या चुकांची माफी असावी. अशी माझी नम्र विनंती आपल्या पवित्र चरणापाशी आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापन.

आपला,
आज्ञांकित सकल संतांचा चरणरज
**दासगणू**
('श्री साईलीला' इ.स. १९२५ एप्रिलच्या अंकातून)

# परब्रह्मीचे ठसे : ज्ञानदेवादी भावंडे

- एस. ए. कुलकर्णी

'ते आनंदाचे अनुकार । सुखाचे अंकुर ।
कि महाबोधे विस्तार । केले जैसे ॥
ते विवेकाचे गांव । कि परब्रह्माचे स्वभाव ।
ना तरि अलंकरले अवयव । ब्रह्मविद्येचे ॥

संत-सत्पुरुष -ब्रह्मज्ञानी कसे असतात याचं विवरण करताना श्री ज्ञानेश्वर माऊलीनं वरीलप्रमाणे निवेदन केलं आहे.' संत आनंदाचा आनंद (अनुकरणीय) सुखाचे बीजांकुरच असतात. महाबोधाचे अवतारच असतात, विवेक त्यांच्या ठिकाणी वास्तव्यास असतो. परब्रह्मच त्यांच्या रुपाने जन्मलेले असते. ब्रह्मविद्या म्हणजे त्यांच्या देहाचे अलंकारच. हे सारं वर्णन, तसं म्हटलं तर श्री निवृत्तीनाथ, श्री ज्ञानदेव, श्री सोपानदेव व ब्रह्मानंदी मुक्ताई या चार देवी भावंडांना तंतोतंत लागू पडते. त्यांच्यामुळेच ब्रह्मस्वरूपाला व ब्रह्मविद्येला योग्य महत्त्व प्राप्त झालं, असं म्हणावं लागेल. संत जनाईनं या भावंडांचं वर्णन केलं आहे अत्यंत भावपूर्ण शब्दांत. **'सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ती दातार ॥ महाविष्णुचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ ब्रह्मा सोपान तो झाला । जगी आनंद वर्तला ॥ आदिशक्ति मुक्ताबाई । दासी जनी लागे पायी ॥'** ब्रह्मा, विष्णु, शंकर व आदिशक्तिचे साक्षात अवतार म्हणजेच ही भावंडे असा जनाईचा स्पष्ट अभिप्राय आहे. **'महाविष्णूचा अवतार। श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर॥'** असं म्हणून या भावंडांना काही काळ अनन्वित छळणारे व नतंर प्रचीति पावलेले. श्री. विसोबा खेचर (नामदेवांचे गुरू) यांनीही दुजोरा दिला आहे. ज्ञानेश्वरांच्या संदर्भात. नामदेव ज्ञानदेवाबद्दल म्हणतात, **'ज्ञानराज माझी योग्यांची माऊली। तेणे निगमवल्ली प्रगट केली॥'** असं तुकाराम म्हणतात. **'ज्ञानियांचा राजा गुरू महाराजा'**

ज्ञानदेवांचा जन्म श्रावण वद्य ८ शके ११९७ रोजी झाला. श्रीकृष्णाचीही जन्मतिथी - गोकुळ अष्टमीची. असा योगायोग जुळतो आहे. त्यांचा जन्म इ. स. च्या भाषेत १२७५ ठरतो. त्यांनी आळंदी येथे कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१८ इ. स. १२९६ रोजी संजीवन समाधी घेतली. ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव', 'हरीपाठ', 'स्फुट अभंग', 'चांगदेव पासष्ठी' अशी मराठी भाषेतील 'साहित्य सोनियाची खाण' समाजाला उपलब्ध करून दिली. श्री निवृत्तीनाथांच्या साहित्यात 'हरीपाठ' (४१ अभंगांचा), स्फुट अभंग ३३५ (यामध्ये

— ❖ ❖ ❖ —


**ब्रह्मा-विष्णू-महेश व आदिमाया म्हणून ज्ञानदेवादी भावंडाचे वर्णन अनेक संतांनी केले आहे. महाविष्णूंचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर। ही संत जनाबाईंची अभंग रचना ज्ञानदेवांच्या अभंग गौरव आहे. ज्ञानदेवादी भावंडांना परब्रह्माचे ठसे म्हणूनही भाविकांनी पूजनीय वंदनीय मानले आहे. अशा भावंडांच्या कार्याचे हे गुणकीर्तन**

— ❖ ❖ ❖ —

सगुण-निर्गुण एकता, गुरुप्रसाद, पंढरी महात्म्य, पंढरीतील काला, नाम संकीर्तन, मुमुक्षु जनाना उपदेश, अद्वैत, या विषयांचा समावेश आहे.) सोपानदेवांनी 'हरीपाठ' (२५ अभंगांचा), स्फुट अभंग (३३) लिहिले. (त्यामध्ये देवांशी संवाद, गुरुप्रसादाने प्राप्त झालेली स्थिती, अद्वैत या विषयांचा समावेश आहे.) मुक्ताईच्या हरीपाठांत १२ अभंग आहेत व स्फुट अभंग जवळजवळ १४० आहेत. (त्यामध्ये गुरुप्रसाद, चांगदेवांशी संवाद, कूट, ज्ञानोपदेश आदींचा समावेश आहे. त्याशिवाय 'ताटीचे अभंग' आहेत. यावरून या भावंडांचं केवढं मोठं ऋण समाजावर आहे याची कल्पना येवू शकते.

या भावंडांची आणखी एक घटना आहे, जी जगातला एकमेव अपवाद ठरेल अशा स्वरूपाची. श्री ज्ञानदेवांनी आळंदीला कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१८ - इ.स. १२९६ रोजी संजीवनी समाधी घेतली. सोपानदेवांनी सासवड येथे माघ वद्य द्वादशी इ. स. १२९६ (शके १२१८) रोजी संजीवनी समाधी घेतली. पुढे चैत्र वद्य द्वादशी शके १२१९ रोजी मुक्ताई अंतर्धान पावली. (स्थळ एदिलाबाद) जेष्ठ वद्य त्रयोदशी शके १२१९ रोजी श्री निवृत्तीनाथानी त्र्यंबकेश्वर इथे संजीवन समाधी घेतली. याचा अर्थ केवळ सात महिन्याच्या अवधीत या चारही भावंडांनी समाधी घेतली आहे. असा कुठे इतिहास आहे जगात आत्मसमर्पणाचा?

श्री निवृत्ती **'नाथ'** या उपाधीसह ओळखले जातात. श्री ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायात आपली गुरुपरंपरा सांगितलेली आहे. 'क्षीरसिंधुपरिसरी। शक्तिचा कर्णकुहरी। नेणों कैं श्रीत्रिपुरारी। सांगितले जे॥ ते



क्षीरकल्लोळाआंतु। मकरोदरि गुपितु। होता तयाचा हातु। पैठें जाले॥ तो म्छप्रसवसृंगी। भग्नावयव चौरंगी। भेटला तो सर्वांगिं। संपूर्ण जाला॥ मग समाधि अव्यया इया। भोगाचा वास नां इया। ते मुद्रा श्रीगोरखराया। दिधली मीनी॥ मग तेही तें शांभव। अद्वयानंदवैभव। संपादिले सप्रभाव। श्री गहिनीनाथी॥ तेणे कलिकलितभूता॥ आला देखौनि निरुता। आज्ञा श्री निवृत्तिनाथा। दीधली असे॥ अनादिगुरुशंकरा। पासौनि शिष्य परंपरा। बोधाचा हा संवसारा। जाला आमतें॥' म्हणजे शंकर, मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, मीनानाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ अशी आद्य परंपरा आहे. श्री ज्ञानदेवांनी श्री निवृत्तीनाथांनाच गुरु मानलेलं आहे व 'निवृत्तीदासु' या शब्दाने आपला स्वत:चा जागोजाग उल्लेख केलेला आहे. (ज्ञानेश्वरीमध्ये) **'तो सर्वोपकारी समर्थ। सद्गुरु श्री निवृत्तीनाथ। राहटत असे मजही आत। रिघोनिया॥ म्हणौनि माझे नीच नवे। श्वासोच्छासही प्रबंध होआवे। गुरुकृपा काम नोहे। ज्ञानदेवा म्हणे॥'** अशी त्यांची कबुली आहे. 'पसायदान'मध्ये त्यांना आशीर्वाद लाभला तो गुरुदेव निवृत्तीनाथांचा. 'एथे म्हणे श्री विश्वेश्वरागे। हा होईल दान पसाओ। एणें वरे ज्ञानदेवो॥ सुखिया जाला॥'

श्री सोपानदेवांनी श्री निवृत्तीनाथांना गुरु मानलेलं आहे. ते म्हणतात, **'तू तंव संपन्न आमुचे हे धन। सांगितली खूण निवृत्तीदेवी॥'** 'निवृत्ती खुणा ज्ञानदेवा हरी। सोपान झडकरी झोंबियेला॥' निवृत्तीनाथांनी खूण सांगितली ज्ञानदेवामार्फत ती मला साध्य झाली असं त्यांचं स्पष्ट वक्तव्य आहे. मुक्ताईदेखील म्हणते, **'मुक्ताई सावध करी निवृत्तीराज। हरिप्रेमें उमज एकतत्त्वें॥'** याचा अर्थ 'श्री निवृत्तीनाथ' हेच या तिन्ही भावंडांचे केंद्रबिंदू - गुरू. सबब हे चारही अवतार 'नाथ संप्रदायी' असल्याने 'पंढरीचा विठ्ठल' त्यांना 'नंतर' गवसला असा काहीजण अर्थ काढतात. पण गुरुदेव निवृत्तीनाथच एका अभंगात म्हणतात- **'निवृत्तीचे गूज विठ्ठल सहज। गयनीराजें मज सांगितले॥'** याचा अर्थ गहिनीनाथही विठ्ठल भक्त होते. मग सारी भावंडे विठ्ठल भक्तितंच रमलेली असणार हे ओघानेच आले. सोपानदेव म्हणतात, **'चलारे वैष्णवहो जाऊ पंढरीसी। प्रेमामृत खूण मागों त्या विठ्ठलासी॥'** मुक्ताई म्हणते,-**'मुक्त जीव सदा होति पै नामपाठे। तेच रुप विटे देखीले आम्ही॥** या भावंडांच्या वडिलांचं नावच मुळी **विठ्ठल** हे होतं.

वस्तुस्थिती अशी होती की, या भावंडांच्या वाडवडिलापासून 'पंढरीची वारी' चालत आलेली होती आणि घरामध्ये अध्यात्मिक चिंतन, मनन, पूजापाठ यांचे संस्कारक्षम वातावरण पिढ्यान्पिढ्या नांदत होतं. या भावंडांचे वडिल विठ्ठलपंत विरक्तवृत्तीचे, त्यांचा विवाह आळीदंचे सिद्धोपंत यांची कन्या रुक्मिणी हिच्याशी झाला. तथापि विठ्ठलपंत संसारात रमलेच नाहीत. तीर्थयात्रेसाठी घरातून निघून त्यांनी रामानंदस्वामी (श्री पादस्वामी) यांचेकडून संन्यास दीक्षा घेतली. त्यांचे गुरुदेव एकदा फिरत फिरत आळंदीस आले असता अनेक स्त्रीपुरुष त्यांच्या दर्शनास गेले. त्यामध्ये विठ्ठलपंतांची पत्नी रुक्मिणीही होती. तिने स्वामीजींना नमस्कार केल्यावर स्वामींनी आशीर्वाद दिला- 'सौभाग्यवती भव, पुत्रवती भव.' रुक्मिणी रडू लागली. तिची विरही हकीकत तेव्हा स्वामीजींना कळाली. ते काशीस परत गेले. त्यांनी विठ्ठलपंतांची कानउघाडणी केली व परत आळंदीस जाऊन प्रपंच करण्याची आज्ञा दिली. त्यानुसार विठ्ठलपंत परत आले. संन्यासाश्रमानंतर प्रपंच हे तेव्हाच्या कर्मठ ब्रह्मवृंदांना आवडले नाही. त्यांनी या दांपत्यावर बहिष्कार टाकला. हे दांपत्य दूर इंद्रायणीच्या तीरावर एका पर्णकुटीत राहू लागले व अतिशय कष्टले. या अवस्थेत दोन-दोन वर्षाच्या अंतराने या दांपत्याच्या पोटी चार मुलें जन्माला आली. **निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान** व **मुक्ता**. ब्रह्मवृंदांनी या कुटुंबाचा अनन्वित छळ केला, तिन्ही मुलांच्या मुंजी करण्यास नकार दिला, इतकेच नव्हे, या दांपत्याला देहांत प्रायश्चिताची शिक्षा सुनावली. अशा छळवादाला कंटाळून हे दांपत्य घरातून रात्री बाहेर पडले व दोघांनी उत्तरेकडे - बद्रिकेदारला जाऊन जलसमाधी घेतली, चारही भावंडे पोरकी झाली.

या भयंकर दुर्दम्य अवस्थेत जेष्ठ बंधु निवृत्ती यांनी आपल्या भावंडांचा सांभाळ केला. मातापित्याच्या प्रेमाने विठ्ठलपंतांनी आपल्या चारही मुलांवर अध्यात्मिक - धर्मग्रंथांचं शिक्षण देऊन सुसंस्कार केलेच होते. त्यातून सर्वांची कुशाग्र बुद्धि, त्यामुळे अध्यात्मामध्ये त्यांची खूप प्रगति झालेलीच होती. निवृत्तींना गहनीनाथांचे दर्शन झालं. नाथांनी निवृत्तीला 'कैवल्यज्ञान' दिलं. त्यामुळे निवृत्तीनाथ आपल्या दिग्विजयी भावंडाचे गुरू झाले. आळंदीस असताना या पोरक्या भावंडांचा ब्रह्मवृंदांनी जो छळ केला, त्याला सीमाच नव्हती. ज्यांनी संपूर्ण जगाला पुढे एवढं महान ज्ञान दिलं, त्या बालकांना भाकरीच्या तुकड्यांसाठी घरोघरी माधुकरी मागावी लागली, मुक्ता पाण्याला गेली असता तिचे डोईवरचे, कमरेवरचे माठ फोडले, मांडे भाजण्यासाठी कुंभार वाड्यांतून आणलेली काहील फोडली- 'संन्याशाची कार्टी' म्हणून जिथे तिथे या भावंडांचा अवमान केला. अपमान केला. या परिस्थितीत ज्ञानदेवांनी स्वत:ला झोपडीत कोंडून घेतले. झोपडीचं दार 'ताटी' बंद करून घेतली, पणतीची ज्योत अधिक प्रज्वलित केली. निवृत्ती

- सोपान माधुकरीला गेलेले, मुक्ता नदीवर पाण्याला गेलेली. ती परत आली. ताटीचं दार बंद असल्याचं पाहून ती घाबरली व 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' अशी आवर्जुन तिने आळवणी केली. (ते 'ताटीचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहेत.) **'संत जेणे व्हावें। तेणे जगबोलणें सोसवे ॥'**, **'सांडी कल्पना उपाधी। तीच साधुला समाधी॥ वाद घालावा कवणाला। अवघा द्वैताचा हा घाला॥'** अशा बोध-विनवणीने चिमुरड्या मुक्ताने ज्ञानदेवांना भानावर आणले. ज्ञानदेवांनी ताटी उघडून मुक्ताला प्रेमानं कवटाळलं. ही घटना जर घडली नसती, तर ज्ञानदेवांची 'साहित्य सोनियाची अध्यात्मिक खाण' मराठी माणसाला लाभली नसती. आत्मघाताने सारं संपून गेलं असतं. सबब, मुक्ताईचं श्रेष्ठत्वं मानणं क्रमप्राप्त आहे.

नंतर ज्ञानदेवांनी नेवाशाला 'ज्ञानेश्वरी'चं निवेदन केलं. **'शके बारा शतें बारोत्तरें। टीका केली ज्ञानेश्वरे। सच्चिदानंद बाबा आदरे। लेखकु जाला॥'** अशी ज्ञानेश्वरीत अंतिम (पुरवणी) ओवी आहे. समोर गुरुदेव निवृत्तीनाथ बसलेले, बाजुला सोपानदेव व मुक्ताई - पुढे श्रोतृवृंद दाटीवाटीने बसलेला, ज्ञानदेवांचं गीतेवरचं भाष्य चालेलं, हे शके १२१२ (इ.स. १२९०) मधले नेवाशाचे स्वर्गसुखाचे अवर्णनीय अनमोल दृश्य ! खुद्द ज्ञानराजांच्या पवित्र वाणीमधून प्रसारित झालेला गंगौध ज्यांनी प्रत्यक्षात आपल्या कर्णसंपुटामध्ये साठविला असेल, त्याचं केवढं महान भाग्य! पुढे या देवी भावंडांच्या सान्निध्यात रमले अनेक संतवर- नामदेव, जनाई, चांगदेव, गोरा कुंभार, विसोबा खेचर, सावंता माळी, नरहरी सोनार, चोखा मेळा, बंका महार, जोगा परमानंद, कान्हो पाठक, जोगा परमानंद, सेना - अशी संतांच्या मांदियाळीचा तो पवित्र कालखंड. भारतभूमी वैकुंठाप्रमाणे पावन झाली. अठरा पगड जाती-धर्माच्या या संत मांदियाळीने ज्ञानदेवांचे स्वप्न साकार केले. म्हणून वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानदेवांनी घातला असं मानणं भाग आहे. तेच संत बहिणाईनं लिहिलं आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया। उभे केले देवालया। हे देवालय म्हणजेच संप्रदायाचे पवित्र मंदिर.

ज्ञानदेवांनी आपले जीवित कार्य संपविले आणि संजीवन समाधी घेण्याचा निर्णय घेतला. या चारही देवी भावंडांच्या अंतिम क्षणी नामदेव त्यांच्याबरोबर होते. त्यांनी प्रत्येक प्रसंग आपल्या प्रभावी व भावनापूर्ण अभंगामध्ये नोंदवून ठेवलेला आहे. कार्तिक वद्य द्वादशी शके १२१८ इ.स. १२९६ रोजी ज्ञानदेवांनी आळंदीला समाधी घेतली. त्या दिवशी आळंदीमध्ये लक्षावधी लोक एकत्रित आले. टाळांचा गजर गगनाला जाऊन भिडला. प्रत्येक जण आक्रंदून अश्रू ढाळीत होते. 'ज्ञानोबा, ज्ञानराजा, असा कठोर निर्णय का घेतला हो !' असा टाहो फोडून स्त्री-पुरुष रडत होते. नामदेवांनी 'निर्वाणीच्या अभंगां'मध्ये या प्रसंगाचं जे वर्णन केलेलं आहे ते केवळ वाचलं तरी मानवी मन कळवळून जातं. स्वत: नामदेवांची अवस्था त्यावेळी कशी झालेली होती हे विशद करताना ते म्हणतात, **'कोण जाणे माझा जीवीचा कळवळा। प्रेमाश्रू डोळा लोटताती॥ नामा म्हणे एथे बोलवेना मज। जातसे निजगुज आवडीचे॥'** आणखी एका ठिकाणी नामदेव म्हणतात, 'कासावीस प्राण मन तळमळी। जैसी का मासोळी जीवनावीण॥' इतरांची अवस्था वर्णन करताना, नामदेव म्हणतात, 'निवृत्ति सोपान मुक्ताई धांकुटी। धरियेली कंठी पांडुरंगे॥ कळवळली मने करिती दीर्घ ध्वनी। आठविती मनी ज्ञानदेव॥' योगीराज निवृत्तींची अवस्था कशी झाली होती? काही केल्या मन रहात नाही॥ **'बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट। ओघ बारा वाट मुरडलाती॥ बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा। तृण रानोमाळा पांगतसे॥ हरिणीवीण खोपी पडीयेली ओस। दशदिशा पाडस भ्रमताती॥'** निवृत्तीनाथ असंही म्हणाले, 'आम्हा मातापिता नित्य ज्ञानेश्वर) नाही आता थार विश्रांतिसी॥' नामदेवांच्या मुलांनी - नारा, विठा यांनी समाधी स्थळ चांगले सारवून, रांगाळ्यांनी सजविले होते. समाधीसाठी ज्ञानदेव समाधीस्थळाकडे निघाले. त्या अवस्थेचं वर्णन नामदेवांनी केलं आहे. 'देव निवृत्तीने धरिले दोन्ही कर। जातो ज्ञानेश्वर बैसावया॥ शेवटच्या चरणांत नामदेव म्हणतात, **'नामा म्हणे आता लोपला दिनकर। बापा ज्ञानेश्वर समाधिस्थ॥'** सूर्य मावळला असं ते म्हणतात. खरोखरच त्या दिवशी चित्सूर्य मावळला!

या घटनेनंतर तिसऱ्याच महिन्यात सोपानदेवांनी सासवडला संजीवन समाधी घेतली. त्याचं वर्णन करताना नामदेव म्हणतात- 'कळवली मन नाही देहभान। वटेश्वर सोपान सोवळे झाले। संत साधुजन होत कासाविसी। आले समाधीपाशी तातडीने॥'

## मुक्ताई समाधी

यानंतर चैत्र वद्य द्वादशीला मुक्ताई अंतराळात विलीन झाली एदिलाबादला. थोरले दोन भाऊ दृष्टीआड झाल्यावर मुक्ताईने खाणं-पिणं सोडून दिलं होतं. ती रोडावून सुकून गेलेली होती. तिच्याकडे पाहून निवृत्तिनाथ म्हणत- 'अरे, त्या मुक्ताईकडे पहारे - तिनं खाणं पिणं वर्ज्य केलंय.' नामदेवांनी म्हटलेलं आहे- **'कडाडली वीज निरंजनी जेव्हा। मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली॥'** वादळामध्ये ती उडून गेली, तिचा देह श्वान-श्वापदांनी नाहीसा केला असेल. असा तर्क लढविणाऱ्या बुद्धिवाद्यांना 'हृदय अंत:करण' असेल असं मानता येणार नाही. मुक्ताईनं देह ठेवला, एवढं तरी माना.

आपल्या तीन भावंडांचा शेवट डोळ्यांनी पाहून निवृत्तीनाथ हताश झाले. ते त्र्यंबकेश्वरला गेले. गहिनीनाथांच्या गुहेच्या डोंगर पायथ्याशी त्यांनीही संजीवन समाधी घेतली. जेष्ठ वद्य त्रयोदशी रोजी नामदेव वर्णन करतात- **'निवृत्तीराज बैसले समाधी सुचित। चिन्मय ती ज्योत उजळली॥'** नामा म्हणे हरि

`शुद्धी नाही सकळा। घाला आता शिळा समाधीसी॥' या चार परब्रह्मि भावंडांचा असा शेवट समक्ष पाहून नामदेवांना महाराष्ट्रात राहवेनासे झाले. ते पंजाबला जाऊन वीस वर्षे राहिले असा सत्य इतिहास आहे. त्यांना अंतर्यामीचं दुःख सहन झालं नाही.

आळंदीच्या ज्ञानराजांच्या दिव्य भव्य समाधीला काशीपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले. खुद्द पांडुरंगाचं वरदान इथे प्राप्त झालं आहे. **'कृष्ण पक्षी तुज निर्धारा। भेट देत जाईन। कार्तिक शुद्ध एकादशी। पंढरी यात्रा होईल सरशी॥ दुसरी कृष्ण पक्षी निर्धारासी। तुज दिधली असे॥'** त्यानुसार आषाढी वारीला ज्ञानदेवांची पालखी आळंदीहून पंढरीला निघते आणि कार्तिकी वारीला श्री पांडुरंगाची पालखी आळंदीला येते.

सासवडला सोपानदेवांचं छोटंसं पण तेजोमयी समाधी मंदिर आहे. एदिलाबादला मुक्ताईचं भव्य मंदिर आहे. (समाधी नाही) पूर्वी एदिलाबाद गावाबाहेर मुक्ताईचं छोटं मंदिर होतं व गावात चांगदेवांचे प्रचंड आकाराचे कोरीव शिल्प मंदिर होतं. चांगदेवांची मूर्ती अवाढव्य आकाराची होती. तापी नदीवर बांधलेल्या धरणात ही दोन्ही मंदिरे बुडून गेली. पाण्यात व निम्म गावही बुडालं. १२० फूट लांब व ७० फूट रुंद असा त्या आजच्या मंदिराचा आकार आहे. संगमरवरी तख्तावर मुक्ताईची अत्यंत देखणी व प्रभावी मूर्ती उभी केलेली आहे. मंदिराभोवती घनदाट पुष्पलताचं, फळ वृक्षांचं निरामय उद्यान आहे. त्र्यंबकेश्वरला निवृत्तिनाथांचं मंदिरही छोटसंच आहे. या चारही मंदिरात जाऊन नतमस्तक होणं हीच काशी-रामेश्वर यात्रा वारकऱ्यांच्या दृष्टिकोनातून.

श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या सप्तशताब्दि संजीवन वर्ष संपूर्ण महाराष्ट्रात श्रद्धा भक्तिभावाने साजरे झाले आहे. गावोगावी हजारो लोकांनी ज्ञानेश्वरीची पारायणे केली आहेत. खुद्द आळंदीला मराठी साहित्य संमेलनही झालं. पालखीमध्ये ज्ञानेश्वरी ठेवून मोठ्या ऐश्वर्याने दिंडी निघाली. महाराष्ट्रानं आपलं हे परम कर्तव्य निष्ठेनं पार पाडलं ही अत्यंत समाधानाची बाबा आहे. परंतु दूरदर्शन - आकाशवाणीनं या संदर्भात काहीही केलं नाही ही बाब जरुर खटकते. बेसूर संगीतात आणि भेसूर नृत्यात अश्लील नंगानाचामध्येच प्रसिद्धी माध्येमे आज मग्न आहेत. कार्तिकी वारी प्रसंगी काही कार्यक्रम प्रसारित केले जातील हे पाहण्यासाठी समाज उत्कंठा मनात बाळगून वाट पाहत होती. या माध्यमांना कर्तव्याची जाण येईल काय?

तसं म्हटलं तर या चारही परब्रह्मि भावंडांचं वैकुंठ गमनाचं हे सप्तशताब्दि वर्ष आहे. आळंदीप्रमाणेच सासवड, एदिलाबाद व त्र्यंबकेश्वरला उत्सव झाले पाहिजेत. माघ वद्य द्वादशी, चैत्र वद्य द्वादशी व जेष्ठ वद्य त्रयोदशी हे दिवस पुण्यस्मरणीय आहेत. तेव्हा तेही उत्सवी स्मरण श्रद्धा निष्ठेनं साजरे होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रीय भावनाप्रधान समाज आपलं हे कर्तव्यही निष्ठेनं पार पाडेल असं वाटतं. सर्व शाळा-विद्यालये - महाविद्यालये या संस्कारी शैक्षणिक संस्थांमध्ये या चारही भावंडांच्या 'हरिपाठा'चं वाचन झालं पाहिजे, 'पसायदान' आळविलं पाहिजे. त्याचा अर्थ समजावून सांगून तरुण पिढीवरही दृढ संस्कार केले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती अवाजवी असं मानता येणार नाही. या परब्रह्मी भावंडांना सविनय श्रद्धा वंदन.

卐卐卐

## माझ्या साईची वैखरी

श्रद्धा आणि सबुरी
माझ्या साईची वैखरी
अखंड तेवे मनात ज्याच्या
त्याला तो उद्धरी
माझ्या साईची वैखरी ॥ धृ ॥
पिडितांची रे नको उपेक्षा
कर्मच देते ज्या त्या शिक्षा
जो जे करतो ते ते पडते
फिरून त्याच्या करी ॥ १ ॥
असो सुखे वा असो रोग तो
जो तो अपुले कर्म भोगतो
नको वाद वा वृथा लोभ तो
तुलना नाही बरी ॥ २ ॥
नको त्रासवू दिनदुबळ्यांना
मुक्यांस देऊ नको यातना
इतरा देशिल त्रास परंतु
दुखेल माझ्या उरी ॥ ३ ॥
भुकेल्यास दे भाकर तुकडा
वस्त्रहिनावर पांघर कपडा
धनधान्याचे उणे कधी ना
पडेल तुझिया घरी ॥ ४ ॥
मनी मानसी भाव जसा रे
अनुभव तैसा सहज मिळे रे
मला रुचि ना मिष्टानांची
पुरते एक भाकरी ॥ ५ ॥
वचने माझी आचरशिल तर
शाल प्रीतिची घालिन तुजवर
घरात तुझिया मी राहिन
अन् तू माझ्या अंतरी ॥ ६ ॥

**– प्रसाद कुलकर्णी**

# संत श्री नरसिंह मेहता

- अशोक मोहिते, बडोदे



— ❖ ❖ ❖ —

**महाराष्ट्राप्रमाणेच गुजराती सुद्धा संताची - साधुची भूमी आहे. गुजरातमध्ये झालेल्या संतांपैकी संत नरसिंह मेहता यांचे नाव भक्तीक्षेत्रात सर्वदूर पोचलेले आहे. श्री नरसिंह मेहता यांच्याबद्दल भाविकांना अधिकाधिक माहिती मिळावी या हेतू श्री मोहिते यांचेकडून मागविलेला खास लेख-**

— ❖ ❖ ❖ —

वैष्णव कुणाला म्हणावे असा प्रश्न जेव्हा मनाला पडतो. त्यावेळी निश्चितपणे पुढील काव्यपंक्ती स्मरणात आल्यावाचून राहत नाही...

**वैष्णव जन तो तेने कहिये, जे पीड पराई जाणे रे,**
**परदुःखे उपकार करे तो, मन अभिमान न आणे रे ।**

संत कवी श्री नरसिंह मेहता याला कोण ओळखत नाही. महात्मा गांधींना हे पद खूप प्रिय होते. ते नित्य हे भजन गुणगुणत असत. 'राष्ट्रीय संत' म्हणून ख्याति पावलेल्या या सौराष्ट्रामधील हरिभजन कवी विषयीचे साहित्य ग्रंथबद्ध झालेले फारसे आढळत नाही.

सौराष्ट्राच्या भूमीने प्राग ऐतिहासिक काळापासून धर्मभावना जोपासली आहे. या पवित्र भूमीत महान ऋषिमुनी यांची नेहमी उपस्थिती असे याच भूमीत श्री कृष्णाला 'द्वारका' नगरी वसविण्याचा मोह झाला. सुदामा इथे होऊन गेला. येथील सागरकिणाऱ्यावरूनच गीतेचे गान साऱ्या विश्वात पसरले. अनेक संत-पुरुषांनी इथे जन्म घेतला. त्यात श्री नरसिंह मेहता एक होत. त्याने निःस्वार्थ हरिभक्तीचे सुंदर नि शाश्वत दर्शन साऱ्या जगाला घडविले.

## बालक नरसिंहराम

भारतामध्ये ज्यावेळी हुमायुनचे शासन होते. त्यावेळी सौराष्ट्रातील जुनागढमध्ये चुडासमा वंशाचे राज्य होते. तसे ते स्वतंत्र क्षत्रिय राज्य होते. तरीसुद्धा त्यांना हुमायुनाला खंडणी द्यावी लागत असे. विक्रम संवत १४७० मध्ये जुनागढच्या एका प्रतिष्ठित 'नागर' कुटुंबामध्ये श्री नरसिंहराम याचा जन्म झाला. पित्याचे नाव होते. कृष्णदामोदरदास व मातेचे नाव होते. लक्ष्मीगौरी! नरसिंहरामच्या वयाच्या पांचव्या वर्षी त्याच्या आईचा देहांत झाला. त्यानंतर त्याचे लालन - पालन आजी 'जपकुंवरी' हिने केले. एक अजब गोष्ट अशी होती की, नरसिंहराम जन्मापासून मुका होता. आजीला याचे भारी दुःख होते. तिला मनोमन खात्री होती की, एक दिवस परमकृपाळू परमेश्वर माझ्या नातवाला जरुर बोलते करेल...

जुनागढमध्ये 'नागर' जातीचे लोक 'हाटकेश्वर महादेवा'च्या नित्यदर्शनाला जात असत. त्याप्रमाणे नरसिंह रामाला त्याची आजी हाटकेश्वराला नित्य नेमाने नेत असे. अशाच एका सायंकाळी आजी नातवासहीत दर्शनाला आली होती. त्यावेळी मंदिराच्या परिसरामध्ये एका बाजूला व्याघ्रचर्मावर एक महात्मा बसलेला तिला दिसला. तो महात्मा हातात माळा घेऊन जप करीत होता. आजीने वाकून त्याला नमस्कार केला. नातवानेदेखील केला. अशा तऱ्हेने त्या महात्म्याचे लक्ष आपल्याकडे वेधून आजीने विनंती केली-

'महाराज, माझा हा नातू आठ वर्षाचा झाला तरी अजून बोलत नाही. त्याचे आई-वडील नसल्यामुळे मला त्याची खूप चिंता वाटते. तेव्हा आमच्यावर दया करा आणि याला बोलते करा-

त्या साधु पुरुषाने त्याच्याकडे वळून म्हटले- 'काय रे पोरा, आजी काय म्हणते?' 'मूक' राहून आजीला अधिक चिंतीत करायचे आहे का?'

परंतु तो मूक बालक काय उत्तर देणार? तो साधुपुढे नतमस्तक झाला. ते बघून साधू म्हणाला, 'बघा, हा तुमचा नातू महान भक्त आहे. तो न बोलून चालणार नाही. तो बोलत नाही हेच पटत नाही...'

'आजापर्यंत तो मुकाच आहे, महाराज!'

'धीर सोडू नका... तो आताच बोलेल' असे म्हणून त्या साधूने नरसिंहरामच्या डोक्यावर हात ठेवला व मधुर वाणीने म्हटले, 'बोल बेटा, **राधेकृष्ण, राधेकृष्ण**...'

नरसिंहरामने उत्तर दिले- **'राधेकृष्ण, राधेकृष्ण**... आणि त्याला कंठ फुटला. त्याला वाचा मिळाली. तो बोलू लागला. आजीच्या हर्ष आनंदाला पारावार राहिला नाही. ती साधुला म्हणाली, **'महाराज माझा नातू बोलत नव्हता तो बोलू लागला आणि प्रथम राधेकृष्ण बोलला...** तिच्या डोळ्यात आनंदाश्रु तरळले.

हा तुमचा नातू महात्म्यांचा महात्मा आहे. परमेश्वराची त्याच्यावर असीम कृपादृष्टी आहे. तो तुमचा कुळाचा उद्धार करणार आहे. तो खरा भक्त आहे. जिथे भक्त जन्म घेतो. तिथे ईश्वराची कृपा आपोआप येऊन वसते. तुम्ही, तुमचे कुटुंब,तुमच्या समग्र नागर जातीचा भाग्योदय होणार आहे...'

या प्रसंगाने मोठा भाऊ बंसीधर आनंदीन झाला. तो त्यावेळी राजदरबार मोठ्या हुद्यावर नोकरीला होता. त्यामुळे त्यांचे कुटुंब नागर जातीमध्ये श्रीमंत गणले जात होते. कुटुंबावरचे हे संकट टळलेले बघून कुणी आनंदी झाले नसले तर ती बंसीधरची पत्नी दुरितगौरी ! तिचा स्वभाव विक्षिप्त होता.

नरसिंहराम अशा तऱ्हने बोलू लागला. भजने गाऊन नाचू लागला. हरिभक्ती मध्ये लीन झाला. त्याचे असे वागणे दुरितगौरीला आवडत नव्हते. ती नवऱ्याजवळ नेहमी तक्रार करीत असे - 'आपल्या नागर कुटुंबामध्ये लहान भावाने घरात असे नाचणे-कुदणे शोभत नाही...

अग, तो ईश्वराची भक्ती करतो आहे. बंसीधर पत्नीची समजूत घालत असे.

भक्तीची पण रीत असते. इतर नागर बघा, घरी पूजा-अर्चा, पाठ संध्या वगैरे करतात त्याप्रमाणे याला करायला हवे. कपाळावर गंध फासून साधुंच्या मेळाव्यात नाचणे व्यर्थ आहे...' असे पुरितगौर म्हणे.

बरं तू, त्याची समजूत घालत जा. तशीच वेळ आली तर रागे भरत जा...

ती नरसिंहरामला रागे भरू लागली. सारखी त्याच्यावर चीड चीड करू लागली.

नरसिंहराम चतुर्भुज झाला तर वहिनीच्या या जाचातून सुटेल असे आजीला वाटले. त्यावेळी लहान वयातच लग्ने होत असत. आजीने बंसीधर पुढे नरसिंहरामच्या लगनाचा विषय काढला. थोड्याच दिवसात त्यांच्या कुळाला शोभेल अशी खानदानी कुळातील कन्या शोधली व **माणेकगौरी** नावाच्या सात वर्षे वयाच्या नागर कन्ये बरोबर नरसिंहराम याचा विवाह झाला.

## हरिभक्ती मार्गे

लग्नानंतर मोठ्या भावाने नरसिंहरामला शिक्षणासाठी संस्कृत पाठशाळेत दाखल केले. त्याने काही दिवस अध्ययन केले. पण अभ्यासात त्याचे काही लक्ष लागत नव्हते. त्याचे मन नित्य राधाकृष्णाच्या स्वरुपाचे चिंतन-अध्ययनामध्ये लीन असे. पाठशाळेत जाण्याऐवजी तो जुनागढला मठ, मंदिरात जाऊ लागला. मंदिरात जाऊन देवी-देवतांचे पूजाअर्चा करून शंकराला स्तुती-सुमने वहात असे. कारण त्यांचे कुळ शिव उपासक होते.

नरसिंहरामाचे शिक्षणात लक्ष लागत नाही हे पाहून मोठ्या भावाने त्याला नोकरीला लावले. स्वतःच्या हाताखाली घोड्याची देखरेख करण्याचे काम त्याला सोपवले. परंतु तिथेही त्याचे मन रमेना ! त्या कामात त्याला मुळीच रस वाटत नव्हता. तेथेही काम बाजूला ठेवून प्रभू भक्तीत तो तल्लीन रहात असे.

अशातच आजीच्या निधनाने तो दुःखी झाला. त्यातच वहिनीचा जाच वाढू लागला. तिचे टोमणे, शिळेपाके खायला देणे त्याला असहय होऊ लागले. त्यामुळे भाऊ घरी असेल तेव्हाच तो घरी जाऊ लागला. कारण आता त्याच्या ठायी सुखदुःखाची भावना राहिली नव्हती. एके दिवशी सरकारी कामानिमित्त भाऊ परगावी गेला असताना नरसिंहरामने सकाळचे घास कापायचे काम पूर्ण करून स्नान आपटले व घासचारा घोड्यांना घालून वहिनीकडे भोजन मागू लागला. त्यावेळी वहिनीने कुत्सितपणे म्हटले -

'या, भोजन तुमच्यासाठी तयार आहे. साधु-बाबांबरोबर भटकून थकला असाल नाही ?'

ते ऐकून नरसिंहराम म्हणाला, 'नाही वहिनी, मी घास कापायला अरण्यात गेलो होतो. त्यामुळे थकलयाने भूक लागली आहे.'

'भोजन घेतल्यावर साधु-संतांच्या संगतीला जायचे आहे. आज या कामातून वेळच मिळाला नाही.' नरसिंहराम भांबडेपणाने प्रत्युत्तरला.

'ठीक आहे बसा' असे म्हणून वहिनीने शिळ्या भाकरीचे तुकडे ताटात वाढून त्याच्यापुढे ठेवले. ते बघून नरसिंहरामची पत्नी माणेकगौरीच्या डोळ्यात अश्रू तरळले. पतीच्या अवहेलनेमुळे ती व्यथित झाली. पण ती काहीच बोलू शकत नव्हती. कुळाची मान-मर्यादा तिला तसे करू देत नव्हती.

शिळ्या भाकरीचे तुकडे त्याच्या गळी उतरत नव्हते. 'वहिनी, हे अन्न चावले जात नाही. त्यामुळे आवडेनासे झाले आहे.'

दुरितगौरीचा पारा वर चढला. 'साधे भाकरीचे तुकडे तुम्ही चावू शकत नाही ? मग काय पंचपक्वान्ने हवीत ? नशीब मजूराचे आणि दिमाख राजाचा ! तुमचा मोठा भाऊ जे पुढे येईल ते मुकाट्याने खात असतात. तुम्हाला मात्र असं तस नको असतं !

तसं नाही, वहिनी ! पण ही भाकरी चावणं कठीण झालं आहे. बहुतके शिळी असावी म्हणून..अन् नुसती भाकरीच कशी खाऊ ? नरसिंहराम गयावया करीत म्हणाला.

'मग जिथं चांगलं खायला मिळेल तिथं का जात नाही ? दोन पैसे कमवायची अक्कल नाही. तुम्हाला हवं ते द्यायला मला परवडण्यासारखं नाही.. वहिनी, खायला घालत नाही म्हणून गावात सांगत सुटाल, तेव्हा या घरातुन तुम्ही निघून जा.' ती संतापून म्हणाली.

'जशी आपली आज्ञा' असं म्हणून नरसिंहराम व माणेकगौरी यांनी माते समान वहिनीला वाकून नमस्कार केला आणि त्याचेवेळी ते घराबाहेर पडले. मोहल्यामध्ये जवळच एक कट्टा होता. तिथे जाऊन ते दोघे बसले.

वसंतऋतु मधील ती रात्र होती. दिवसभराचा थकवा होता. त्यामुळे झोप अनावर झाली होती. तरीसुद्धा नरसिंहरामच्या मनात एक अंधुक आशा होती की वहिनी येईल.. घरी चला म्हणेल. पण तसे घडले नाही. पहाट झाली तरी त्यांना घरी नेण्यासाठी कुणी आले नाही. तेव्हा नरसिंहरामाला वाटले आता घरी परत जाणे व्यर्थ आहे. आणि त्याने निर्णय घेतला. तो एकटाच जुनागढ बाहेर पडला.

## महादेवाची कृपादृष्टी

गावाच्या बाहेर गर्द झाडी होती. संध्याकाळपर्यंत त्या झाडीत तो अडकळत-ठेचकाळत भटकत राहिला. अखेर थकून वटवृक्षाखाली पहुडला. त्याच्या डोक्यात विचाराचे काहूर माजले.. अशावळी माझे रक्षण कोण करणार ? लहानपणापासून शिवाची उपासना केली. आजीबरोबर नित्य हाटकेश्वराचे दर्शन घेतले. तोच कैलासपती माझा तारणहार ठरेल... 'हे भूतनाथा कुठं आहेस तू! नरसिंहरामचे अंत:र्मन आक्रंद करू लागले. त्याचक्षणी वटवृक्षाजवळ असलेले शिवालय त्याला दृष्टीस पडले. ते बघून त्याचे मन आनंदीत झाले. तो उठून मंदिरात गेला. महादेवाला बाहुपाशात घेऊन प्रार्थना करू लागला.

'हे शिवा! हे कल्याणमूर्ती! हे प्रलयंकरा, हे कैलासपती, हे उमानाथ, हे शंकरा, माझी विचित्र अवस्था झाली आहे. ही स्थिती मला असह्य झाली आहे. चौफेर अंधकार पसरला आहे. कुठेच आशेचं किरण दिसत नाही. हे नाथ, तुम्ही कृपा करा. माझ्या मनाचा हा मनस्ताप दूर करा...'

नरसिंहरामची भक्ती सच्ची होती. त्याच्या अंत:र्मनातील अंर्तनाद हा सच्चा होता. सात दिवस सतत त्याच अवस्थेत पडून तो महादेवाला विनवीत होता...

अशा तऱ्हेने सात दिवस त्याच अवस्थेत पडून त्याने महादेवाची प्रार्थना केली. सातव्या दिवशी मध्यरात्री देव प्रत्यक्ष प्रगट झाले. खाली मुंडी घालून बसलेल्या नरसिंहरामचे खांदे पडकून त्यांनी त्याला बसवित म्हटले- 'हे भक्ता! मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे...'

कैलासनाथाचे साक्षात स्वरूप डोळ्यासमोर उभे ठाकलेले होते. क्षणभर त्याचा यावर विश्वास बसेना! त्याचा कंठ दाटून आला. तो कसेबसे म्हणाला, 'हे नाथ, अखेर सेवकाचे खांदे तुम्हाला पकडावे लागले.'

'तुझी भक्ती अजोड आहे, नरसिंहराम! माग... वर माग! तू मागशील ते वरदान द्यायला मी तयार आहे...'

'मी मंदबुद्धी माणूस तुमच्याकडे काय मागू? तुम्हाला जे प्रिय असेल ते मला द्या...'

'नरसिंहराम, माझ्या दृष्टीने मला जे कुणी प्रिय असेल तो फक्त श्रीकृष्ण! त्याच्याशिवाय मला कुणी प्रिय नाही.

तुझी इच्छा असेल तर त्याचे दर्शन तुला घडवितो...'

'होय नाथ! अगदी माझ्या मनातलं बोललात! मला त्या योगयोगेश्वर श्रीकृष्णाचे व त्याच्या रासनृत्याचे दर्शन करावा!'

'तथास्तु!' ... म्हणून महादेवाने नरसिंहरामला स्वत:सोबत वृषभावर बसविले आणि द्वारिका नगरीकडे प्रयाण केले. ती दिव्य नगरी दृष्टीस पडताच तो चकित झाला. त्या नगरीमध्ये धरतीवर धुळ नव्हती, दगडधोंडे नव्हते. ती निव्वळ सोन्याची धरती होती. तेजोमय पथ होते, इंद्रधनुष्याच्या मोहक रंगाप्रमाणे लाल, हिरव्या, पिवळ्या, निळ्या, जांभळ्या, गुलाबी रंगाचे महाल उभे होते. प्रत्येक महालयात उद्यान होते. कारंजे होते. विविध वेलांची लता मंडपे होती. सुगंधी फुलांची रोपटी होती.

कैलासनाथ नरसिंहरामला घेऊन श्रीकृष्णाच्या धर्मसभेत आले. तिथे विविध मौल्यवान हिरे, मोती, माणके जडीत सिंहासनावर देवकीनंदन श्रीकृष्ण विराजमान झाले होते.

श्री शंकराचे आगमन झाल्याने श्रीकृष्णासहीत सभेतील सर्व उपस्थित जण उठून उभे राहिले व दोन्ही हात जोडून

श्रीशंकराचे त्यांनी स्वागत केले. त्यानंतर एका सुंदर आसनावर श्रीशंकराला बसवून श्रीकृष्णाने त्यांचे विधिवत पूजन केले आणि आगमनाचे कारण विचारले.

'हे परमेश्वरा, हा जुनागढचा नागर नरसिंहराम माझा भक्त आहे. सतत सात दिवस भूक-तहानेची पर्वा न करता त्याने माझ्या सान्निध्यात मला प्रसन्न केले आहे. मी त्याला वरदानमध्ये तुमचे दर्शन, तुमची भक्ती आणि तुमचे महा रासनृत्य यांचे दर्शन करविन असे कबुल केले आहे. म्हणूनच त्याला मी इथे घेऊन आलो आहे.'

श्री शंकराचे हे उद्‌गार ऐकून श्रीकृष्ण म्हणाले, 'हे महादेवा, तुम्ही आणि मी भिन्न नाही. तुमची भक्ती तीच माझी भक्ती! तुम्हाला प्रिय तेच मला प्रिय! म्हणूनच तुम्ही जे वरदान दिले तेच माझे वरदान ठरते...'

'तर मग मला जाऊ द्या...' असे म्हणून महादेव वृषभावर बसून निघून गेले.

### श्रीकृष्णाच्या सान्निध्यात नरसिंहराम

त्यानंतर श्रीकृष्णाने नरसिंहरामाचा हात धरुन त्याला स्वत:चे वैभव दाखविले.

नरसिंहराव श्रीकृष्णाच्या सेवेत राहिला. अशातचा कोजागिरी पौर्णिमा आली आणि दिलेले वचन पाळायचे होते. म्हणूनच श्रीकृष्णाने महारास नृत्याचे आयोजन करविले. रास नृत्याला सुरुवात होताच श्रीकृष्णाने नरसिंहरामाच्या हातात मशाल देऊन त्याला रास मंडळाच्या मधोमध बसविले. रास नृत्याची रंगत वाढत गेली. नरसिंह देहभान हरवून भोवतालचे दृष्य न्याहाळत होता. तो संपूर्ण कृष्णमय झाला होता. तो स्वभान विसरला होता. हातातली पेटती मशाल संपून त्याचा हात पेटला. तोच मशाली प्रमाणे पेटू लागला. त्याचे सुद्धा त्याला भान राहिले नाही. एवढा तो रासनृत्यामध्ये तल्लीन झाला होता. रासनृत्य पूर्ण झाले. श्रीकृष्णाच्या नजरेस नरसिंहचा पेटता हात पडला. श्रीकृष्णाने धावत जाऊन आधी त्याचा पेटता हात विझवला. त्याची तन्मयता, तल्लीनता बघून ते खूष झाले आणि त्यांनी त्याचा हात पूर्ववत करून त्याच्या जळालेल्या हाताची पीडा दूर केली. देवी रुक्मीणीने प्रसन्न होऊन गळ्यातील हार काढला व त्याला अर्पण केला.

एक दिवशी श्रीकृष्णाने नरसिंहाला म्हटले, 'हे वत्स, माग जे हवं असेल ते माग...' त्यावर नरसिंह म्हणाला, 'हे परमकृपाळू परमेश्वरा, ज्याला पारसमणि मिळाला असेल तो धनाची अभिलाषा का बाळगेल!'

'तू एक गृहस्थ आहेस. प्रत्येक गृहस्थाच्या माथी काही ऋण असते. तीन प्रकारचे ऋण त्याला फेडावे लागतात. पहिले ऋण मातेचे, दुसरे पितृ ऋण, तिसरे देव ऋण! मानव गृहस्थाश्रम अंगीकारून या तिन्ही ऋणांतून मुक्त होत नाही. तोपर्यंत त्याला पुर्न:जन्म घ्यावा लागतो, म्हणून तू माझ्या आज्ञेने मृत्यू लोकांत जाऊन या तिन्ही ऋणांतून मुक्त हो...' श्रीकृष्णाने त्याला पटविले. 'पण देवा, तुमच्या चरणाची धूळ, तुमचे सान्निध्य प्रत्यक्ष मला लाभल्यावर माझ्यावर काहीं ऋण राहिले असतील असं मला वाटत नाही...'

'भक्ता, तुझं म्हणणं सत्य आहे. माझ्या शरणी आलेला ऋण मुक्त होत असतो. तेव्हा तुझ्या माथी काही ऋण शिल्लक राहिलेत असे समजू नको. तरीसुद्धा लोकाग्रहास्तव तुला ऋणमुक्त व्हावेत लागेल. तू मृत्यु लोकांत जाऊन सगळी कार्ये माझी पुजा समजून कर. मी तुला माझी प्रतिमा देतो. तिची पूजा -अर्चा केल्याने तुझी भक्ती अधिक दृढ होईल. सोबत या चिपळ्या देतो. या चिपळ्यांच्या तालावर जेव्हा तू माझे भजन गाशील तेव्हा प्रत्यक्ष तुझ्यासमोर हजर होईन आणि गृहस्थाश्रमातील तुझी सर्व कार्ये मी पूर्ण करून देईन...' जगदिश्वराचे हे आश्वासन ऐकून नरसिंह मृत्युलोकांत परत येण्यासाठी तयार झाला.

त्यानंतर श्रीकृष्णाने स्वत:च्या हाताने त्याला पीतांबर नेसविले. त्याच्या डोक्यावर मोराचे पीस खोचलेला मुकुट घातला आणि गरुडावर बसवून जुनागढमध्ये आणून सोडले...

आशा तऱ्हेने नरसिंह मृत्युलोकी परत आला.

**(क्रमश:)**

**अशोक कृ. मोहिते**

卐卐卐

## होऊ द्या हो...

होऊ द्या हो ज्ञानेश्वरा तुझ्या गीतेतील ओवी ।
विठ्ठलाच्या पायापाशी भक्तजने नित्य गावी ।। १ ।।
होऊ द्या हो तुकारामा तुझ्या गाथेत अभंगा ।
कीर्तनाला चढू द्या हो इंद्रायणी काठी रंगा ।। २ ।।
होऊ द्या हो रामदासा दासबोधात समास ।
गडाचिया पायथ्याशी नित्य करू द्या हो वास ।। ३ ।।
होऊ द्या हो एकनाथा भागवतातील श्लोक ।
भेटी येतील धावत स्वर्गलोकीचेही लोक ।। ४ ।।
होऊ द्या हो मोरोपंता तव केकातील आर्या ।
भेटी होईल निश्चित साईनाथा गुरुवर्या ।। ५ ।।
होऊ द्या हो तुलसीदासा मानसातील चौपाई ।
भेटतील सहजची रामचंद्र - सीतामाई ।। ६ ।।
होऊ द्या हो कबीरजी तव कवनात दोहे ।
जान्हवीच्या काठावर भोळा सांब वाट पाहे ।। ७ ।।
होऊ द्या हो साईनाथा तव चरणीचा रज ।
किंवा राहून धुनित उदी होईल सहज ।। ८ ।।

**– विश्वनाथ कुलकर्णी**, मलकापूर